रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
वर्ष १८ ◆ अंक ६८
www.ramprahar.com
गुरुवार, २५ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

बनावट नोटांचा छापखाना उघडकीस; तिघांना अटक/५
भाजपतर्फे महिला रिक्षाचालकांचा सन्मान/६
पतीचे गुपित सांगण्याच्या बहाण्याने महिलेचा विनयभंग/७

## जहाजबांधणी उद्योगाला केंद्राकडून ६९,७२५ कोटींचा निधी



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने बुधवारी (दि.२४) भारताच्या जहाजबांधणी आणि सागरी क्षेत्राला चालना देण्यासाठी ६९,७२५ कोटी रुपयांच्या पॅकेजला मंजुरी दिली, सरकारचे मत आहे की ते धोरणात्मक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. सरकारने जारी केलेल्या पॅकेजअंतर्गत, जहाजबांधणी आर्थिक सहाय्य योजना ३१ मार्च २०३६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यासाठी २४,७३६ कोटींचा निधी वाटप करण्यात आला आहे. जहाज तोडण्याच्या क्रेडिट नोट्ससाठी ४,००१ कोटींची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, सर्व उपक्रमांवर देखरेख करण्यासाठी राष्ट्रीय जहाजबांधणी अभियानाची स्थापना केली जाईल. सरकारने जहाजबांधणी विकास योजनेलाही मान्यता दिली आहे, ज्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद १९,९८९ कोटी आहे. देशांतर्गत जहाजबांधणी क्षमता दरवर्षी ४.५ दशलक्ष सकल टनांपर्यंत वाढवण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे.

# राज्य शासनाची पूरग्रस्तांना सरसकट मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही | पूरग्रस्त भागाची पाहणी; जनतेला धीर

**सोलापूर : प्रतिनिधी**

जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले शेती पिकांचे, जनावरांचे, घरांचे व व्यावसायिकांचे खूप मोठे नुकसान झाले असून राज्य शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या पूर्णपणे पाठीशी असून नागरिकांना सर्वतोपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पूरग्रस्त नागरिकांनी अशा संकटाच्या काळात धीर धरावा, असे आवाहनही त्यांनी केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील निमगाव तसेच दारफळ सीना या गावाला भेट देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी केली, त्यांनी दोन्ही गावातील नागरिकांशी संवाद साधला. याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टी व पूर आल्यामुळे ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या सर्वांना शासनाकडून मदत दिली जाणार आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पूरग्रस्तांना तातडीची मदत म्हणून दोन हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुढेही पूरग्रस्तांना आवश्यक ती मदत देण्यात येणार आहे. टंचाई काळात ज्या निकषाप्रमाणे मदत करण्यात येते त्याप्रमाणेच अतिवृष्टी, ओल्या दुष्काळातही मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

#### 'पंचनामे तातडीने पूर्ण करा'

सर्व नुकसानग्रस्त घटकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. कोर्टी (ता. करमाळा), मुंगशी (ता. माढा), लांबोटी (ता. मोहोळ) या भागांतील पूरग्रस्त परिस्थितीची पाहणी उपमुख्यमंत्री पवार यांनी केली. त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

#### जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या धाराशिव जिल्ह्याचा दौरा करत आहेत. त्यांनी पूरग्रस्त भागातील नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे कीट दिले. पूरग्रस्तांसाठी तयार करण्यात आलेल्या या किटमध्ये साधारण १२ दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे. ही सर्व सामग्री पूरग्रस्त कुटुंबांना तात्काळ मदत मिळावी यासाठी देण्यात येत आहे.

## पाणीपट्टी करावरील शास्ती माफ करण्यासाठी अभय योजना लागू करा

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची आयुक्तांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पाणी पट्टी करावरील शास्तीमध्ये सवलत (अभय योजना) लागू करून १०० टक्के शास्ती माफ करण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या संदर्भात त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल महापालिका स्थापन होऊन नऊ वर्षे पूर्ण झाली आहे. पनवेल महापालिकेमार्फत सध्या मालमत्ता धारकांसाठी अभय योजना लागू केली असून या योजनेचा नागरीक मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत. त्यामुळे पनवेल महापालिकेचे थकीत मालमत्ता कर देखील जमा होण्यास मदत होत आहे. याच धर्तीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांकडून पाणी पट्टी करावरील शास्ती माफ करण्यासाठीदेखील अभय योजना लागू करावी, अशी मागणी होत आहे. त्यामुळे पाणी पट्टी करावरील ही शास्ती १०० टक्के माफ करण्याकरीता पनवेल महानगरपालिकेकडून अभय योजना लागू करणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून नागरीक वेळेत पाणी पट्टी बीले भरतील व पनवेल महानगरपालिकेस थकीत पाणी पट्टी कर जमा होण्यास मदत होईल व पनवेल महापालिकेच्या उत्पन्नातदेखील भर पडेल.

या सर्व विषयाचे महत्वपूर्ण गांभिर्य लक्षात घेता पनवेल महानगरपालिका हद्दीतील पाणी पट्टी करावरील शास्तीमध्ये सवलत देण्यासाठी अभय योजना लागू करून १०० टक्के शास्ती माफ करण्याकरीता पनवेल महानगरपालिका प्रशासनाकडून लवकरात लवकर योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, असेही माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी निवेदनात अधोरेखित केले आहे.

## पनवेलमध्ये आज सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**पनवेल :** सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध समाजोपयोगी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २४व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा गुरुवारी (दि.२५) दुपारी ३ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या वेळी माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या दिवाळी अंकांना पारिताषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

सोहळ्याला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. दिवाळी अंकाच्या या स्पर्धेतील विजेत्यांना लाखो रुपयांची पारितोषिके देऊन त्यांच्या सर्जनशीलतेचा सन्मान केला जातो.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार आहे, असे मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे यांनी कळविले आहे.

## मराठवाड्याला आणखी पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठवाड्यासमोरील संकट आता अधिक गडद होण्याची शक्यता आहे. पुढचे पाच दिवस म्हणजे, २५ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर या दरम्यान राज्यासह मराठवाड्यातील काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर २७ सप्टेंबर रोजी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पूरग्रस्तांसाठी सुरू असलेल्या मदतकार्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

बंगालच्या उपसागरात पुढील २४ तासात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होणार आहे. सोबतच, चक्रीय स्थिती असल्याने राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पुढील ५ दिवसांत, म्हणजे २५ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर या दरम्यान राज्यातील सर्वच भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यापैकी मराठवाड्यात पावसाची तीव्रता अधिक असणार आहे.

विदर्भातील काही भागात २४ ते २७ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर काही भागात अतिमुसळधार पाऊस पडणार आहे. विदर्भ आणि मराठवाडा या दोन्ही भागात २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान पावसाचा जोर अधिक असणार आहे.

राज्यभर असलेल्या पावसाची शक्यता लक्षात घेता मच्छिमारांना २५ ते २९ सप्टेंबर दरम्यान समुद्रात न जाण्याचे आवाहन हवामान खात्याकडून करण्यात आले आहे.

## निवडक

### रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांच्या वेतनाएवढा दिवाळी बोनस मंजूर

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने रेल्वे खात्यातील कर्मचाऱ्यांना दिवाळीची मोठी भेट दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत रेल्वे विविध क्षेत्रासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांच्या वेतनाएवढा बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे दिवाळी आणि छठपुजेपूर्वी लाखो कर्मचाऱ्यांना आनंदाची भेट मिळाली आहे.

### दोन म्हशींमुळे रखडली मध्य रेल्वे; प्रवाशांना मनस्ताप

**मुंबई :** वांगणी आणि बदलापूरदरम्यान बुधवारी सकाळी दोन म्हशी एका लोकल ट्रेनखाली अडकल्यामुळे मध्य रेल्वे मार्गावरील हजारो प्रवाशांना फटका बसला. वांगणीजवळ रुळ ओलांडणाऱ्या म्हशींच्या कळपापैकी दोन म्हशी ट्रेनखाली अडकल्याने मुंबई-बाउंड ट्रेन अचानक थांबली. कळपातील म्हशींनी रूळ ओलांडले असले तरी, दोन म्हशी ट्रेनखाली अडकल्या, ज्यामुळे सेवा एक तासापेक्षा जास्त काळ विलंबाने सुरू झाली.

## 'खोपोली भाजप अभेद्य'

**खोपोली : प्रतिनिधी**

भाजप नंबर एकच पक्ष असून, दररोज हजारो विविध पक्षातील कार्यकर्ते भाजपत प्रवेश करीत असून, एक दोन इकडे तिकडे गेले तर पक्षाला काहीही फरक पडत नाही असे प्रतिपादन जिल्हा कार्यकारणी सदस्य व माजी नगरसेवक इंदरमल खंडेलवाल यांनी पत्रकारांशी बोलताना पलटवार केला. काही दिवसांपूर्वी प्रसार माध्यमात खोपोली भाजपला खिंडार पडल्याचे वृत्त प्रकाशित करण्यात आले त्याबाबत पत्रकारांशी बोलताना त्यांनी त्या वृत्ताचे खंडन केले आहे.

अलीकडेच पक्षातून गेलेल्या तीन जण हे मुळातच पक्षाशी एकनिष्ठ नव्हते, त्यांनी उमेदवार मागील नगर परिषद निवडणुकीतील पराभूत उमेदवार होते. त्यातील एकाच तर डिपॉझिट जप्त झाले होते अशा पदाधिकाऱ्यांना राष्ट्रवादीने पक्षात घेऊन काय साध्य केले? याबाबतही त्यांनी सवाल उपस्थित केला. पक्षाने त्यांना भरभरून दिले होते, भारतीय जनता पक्ष दिवसेंदिवस वाढतच आहे. हजारो कार्यकर्त्यांचा दररोज प्रवेश होत आहे.

भाजपमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांचा भरणा आहे. त्यामुळे एक दोन गेल्याने पक्षाला खिंडार पडले असे म्हणणे चुकीचे असल्याचे पण त्यांनी सांगितले. आगामी खोपोली नगर परिषद निवडणुकीत जनतेला भ्रष्टाचार मुक्त प्रशासन देण्याचा संकल्प केला असून यासाठी नगराध्यक्षसहित नगरसेवकही टोला मोलाचे असणार असल्याने नगराध्यक्षपदासाठी ही खोपोली भाजप आग्रह धरणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख उपस्थित होते.

## कर्मवीर अण्णांचा आदर्श घेऊन पुढे जाऊया -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था घडवली आणि त्यांचा आदर्श घेऊन घडलेल्या वारसदारांनी ही संस्था मोठी केली, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी (दि.२४)उलवे येथे जयंतीच्या कार्यक्रमात केले तसेच येत्या काळामध्ये सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल हे नवी मुंबईतील प्रथीत यश स्कूल म्हणून उज्वल यश संपादन करणार असा विश्वास व्यक्त करुन कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेऊन आपण पुढे जायचे आहे, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.



उलवे येथील रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससी व मराठी माध्यम विद्यालयाच्यावतीने पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ जयंती आणि पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. हा सोहळा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महेंद्र घरत, प्रमुख वक्ते दिनेश सासवडे, मॅनेजिंग कॉन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, सीबीएसई विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, मराठी विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर, अनंता ठाकूर, स्थानिक स्कुल कमिटी सदस्य निलेश खारकर, कविता खारकर, धीरज ओवाळेकर, राजेश खारकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर..)



# मत्स्य शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करा -मंत्री नितेश राणे

**मुंबई :रामप्रहर वृत्त**

अतिवृष्टीमुळे मत्स्य शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल येत्या १० दिवसात सादर करावा. तसेच अधिकाऱ्यांनी स्वतः स्थळ पहाणी करून आणि मत्स्यव्यवसाय संस्थांशी संपर्क करून नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती घ्यावी, असे आदेश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज दिले.



अतिवृष्टीमुळे मत्स्य शेतीच्या झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्याविषयी मंत्रालयात बैठक झाली. यावेळी मंत्री श्री. राणे बोलत होते. बैठकीस मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील सर्व मत्स्यव्यवसाय उपायुक्त दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची ही वेळ असल्याचे सांगून मंत्री श्री. राणे म्हणाले की, अधिकाऱ्यांनी स्वतः मत्स्य शेतकऱ्यांना संपर्क केल्यास त्यांचे मनोधैर्य वाढते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी स्वतः नुकसानग्रस्त मत्स्य शेतकऱ्यांची भेट घ्यावी. पंचनामे करताना वस्तुनिष्ठ महिती घ्यावी. ज्या जिल्ह्यात पंचनामे करण्यासाठी अधिकारी कमी आहेत त्या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी न झालेल्या इतर जिल्ह्यातील अधिकारी नियुक्त करून पंचनामे लवकर पूर्ण करण्याची कार्यवाही करावी. पंचनाम्याची माहिती जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करून त्याची प्रत मंत्रालय स्तरावर सादर करावी. मत्स्य बिजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्याची सविस्तर माहिती सादर करावी. माहिती सादर करत असताना बाब निहाय अकडेवारी द्यावी, अशा सूचनाही मंत्री श्री. राणे यांनी दिल्या.

मंत्री श्री. राणे म्हणाले की, तलावातील गाळ काढला गेला नसल्याने मत्स्य शेतकऱ्यांचे जास्त नुकसान झाले आहे. त्यामुळे पुढील वर्षी जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांमध्ये तलावातील गाळ काढण्याचे नियोजन करावे. या कामासाठी तातडीने कार्यवाही सुरू करावी. अधिकाऱ्यांनी रोज किमान आठ ते दहा तलावांना भेट द्यावी. दिलेल्या भेटीचा अहवाल वरिष्ठ कार्यालयामार्फत सादर करावा, असेही मंत्री श्री. राणे यांनी यावेळी सांगितले.

# हुतात्मा नाग्या महादू कातकरी दिनानिमित्त पेण येथे वनहक्क जागर

**पेण: प्रतिनिधी**

अंकुर ट्रस्ट आणि आदिवासी समाज वन हक्क जागर यांच्या संयुक्त विद्यमानाने गुरुवार, दिनांक २५ सप्टेंबर रोजी हुतात्मा नाग्या महादू कातकरी हुतात्मा दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पेण येथील चिरनेर जंगल सत्याग्रहातील आदिवासी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनी हा कार्यक्रम होणार असून या निमित्त सुरू असलेल्या वन हक्क जागर अभियानाचा समारोप देखील करण्यात येणार आहे.

या संदर्भात माहिती देताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी सांगितले की, गेल्या एक महिन्यापासून अंकुर ट्रस्ट मार्फत आदिवासी समाजात वनहक्काबाबत



हुतात्मा नाग्या महादू कातकरी

जनजागृती केली जात आहे. अंकुर ट्रस्ट ही संस्था गेली ३० वर्षे पेण, रायगड परिसरात आदिवासी हक्कांसाठी कार्यरत आहे. पेण येथे वनहक्क जागरचा समारोपयाचबरोबर अंकुर ट्रस्ट या संस्थेतील आदिवासी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २५ वर्षांपासून कोकणात संपूर्ण आदिवासी पट्ट्यात आदिवासी अस्मितेची चळवळ सुरू असून, वनहक्क, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्यायासाठी निरंतर संघर्ष केला जात आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास नेहमीप्रमाणे हुतात्म्यांच्या प्रतिमेची मिरवणूक पेण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून निघेल आणि तिचे विसर्जन महात्मा गांधी वाचनालयात होईल.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील असतील, कोकण महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार व प्रकल्प अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

अंकुर ट्रस्टचे आदिवासी विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत नृत्य व गायन सादर करणार असून, वनहक्कासाठी दिलेला लढा आणि हुतात्म्यांचे बलिदान स्मरणात ठेवत प्रेरणादायी कार्यक्रम पार पडणार आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे रक्तदान शिबिर





**माणगाव : बातमीदार**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जेजे रुग्णालय रक्तपेढी विभाग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात रक्तदान शिबिराचे आयोजन बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल प्राध्यापक डॉ.कारभारी काळे यांनी केले.

यावेळी ब्लड बँक ऑफिसर डॉ. मयूर सोनवणे,सोशल सर्विस सुप्रिटेंड श्री. कदम, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्राध्यापक डॉ. हेमंत व्हाटकर आणि विद्यापीठाचे इतर मान्यवर उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात थॅलेसेमिया चाचणी सुद्धा केली गेली असून या थॅलेसेमिया चाचणीमध्ये एकूण २४७ जणांनी सहभाग घेतला होता .

या रक्तदान शिबिराचे आयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. हेमंत वराटकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले एकूण १०० लोकांनी सहभाग घेतला होता. या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी या रक्तदान शिबिरासाठी विशेष असे प्रयत्न केले

# आदी कर्मयोगी अभियानांतर्गत कोतुर्डे येथे मेळावा

**महाड: प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकारने धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महाड तालुक्यातील कोथुर्डे येथे मेळावा झाला.



रायगड जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील ११३ गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. यापैकी महाड तालुक्यातील पारवाडी व कोतुर्डे या दोन गावांचा समावेश आहे. जिल्ह्यात आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रमाला सुरुवात झाली असून महाड तालुक्यातील कोतुर्डे - निवाची वाडी आदिवासी वाडी येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी पोपट ओमासे उपविभागीय अधिकारी महाड, महेश शितोळे तहसिलदार महाड, स्मिता पाटील गट विकास अधिकारी , सहाय्यक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री खटकाळे, नायब तहसिलदार श्री.बाबासाहेब भाबड, सरपंच, उपसरपंच यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आदि कर्मयोगी अभियानांतर्गत आपल्याला गावाचा विकास आराखडा तयार करणे. त्या आराखड्याला २ ऑक्टोबर रोजी आपल्या ग्रामसभेत ठेवून मान्यता घेऊन ती सर्व कामे प्राधान्याने करावयाच्या सूचना दिल्या. आदिवासी बांधवांसाठी दळी जमिनीचे प्लॉट निश्चिती व वारस नोंद करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा राबविण्यात येत असून यामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत आदिवासी बांधवांचे जन्म दाखले बाबत विशेष मोहीम राबवून जन्म दाखले व आधार नोंदणी करण्याबाबत सूचित केले. महसूल विभागाचे राजस्व अभियान व ग्रामविकास विभागाचे मुख्यमंत्री पंचायतराज अभियान यांचा उद्देश तळागाळातील आदिवासी बांधवांना सशक्त करणे व गावांचा सर्वांगीण विकास साधणे त्याचप्रमाणे शासनाच्या सर्व योजनांचा लाभ पोहोचविणे हा आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

# वेदक महाविद्यालयात विकसित भारत २०४७ वर मार्गदर्शन

**तळा -प्रतिनिधी**

स्वच्छता ही सेवा अभियान अंतर्गत २३ सप्टेंबर२०२५ रोजी ई-३३, जी. एम. वेदक महाविद्यालय, तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने प्रेरणादायी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते एन एस एस क्षेत्रीय समन्वयक व एन एस एस कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रविण गायकवाड,प्रभारी प्राचार्य डॉ .एस.एस.मिर्झा, डॉ.एन.एम. शेख, डॉ.एस.व्ही बंगाळे, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ.प्रविण गायकवाड यांनी आपल्या व्याख्यानात एनएसएस आणि विकसित भारत २०४७ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. सन २०४७ पर्यंत भारताचा विकसित देशांच्या श्रेणीत समावेश व्हावा यासाठी तरुणाईने शिक्षण, नवोन्मेष, सामाजिक जबाबदारी व समाजसेवेच्या माध्यमातून योगदान देणे किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी भर दिला. तरुण स्वयंसेवक राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत कसा मोलाचा वाटा उचलू शकतो हे त्यांनी प्रेरणादायी उदाहरणांसह स्पष्ट केले.

तसेच, राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे व विविध उपक्रम याविषयी त्यांनी माहिती दिली. एनएसएस कार्यामुळे युवकांमध्ये नेतृत्वगुण, शिस्तप्रियता, स्वावलंबन व सेवाभाव विकसित होतो, असे त्यांनी अधोरेखित केले. समाजकार्य हेच खरी राष्ट्रसेवा असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना त्यांनी सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एन. एम. शेख (एनएसएस कार्यक्रम अधिकारी) यांनी केले, तर उपस्थितांचे आभारप्रदर्शन डॉ. एस. व्ही. बंगाळे (एनएसएस कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. या प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एस. मिर्झा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.




# आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान देशभर सुरू होत आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती (२५ सप्टेंबर) ते भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जयंती (२५ डिसेंबर) या काळात हे अभियान राबविण्यात येणार आहे.



या अभियानाचा उद्देश प्रत्येक भारतीयाला स्वदेशी संकल्पाशी जोडणे, लोकसहभागातून राष्ट्रनिर्मितीला गती देणे आणि वोकल फॉर लोकल चा संदेश घराघरात पोहोचवणे असल्याचे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी डोंबिवलीत केले.

नमो रमो या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या गरबा कार्यक्रमस्थळी घर घर स्वदेशी हा संदेश देणाऱ्या महाकाय आकाश फुग्याचे अनावरण या वेळी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

पान १ वरुन

## कर्मवीर अण्णांचा आदर्श घेऊन पुढे जाऊया -लोकनेते रामशेठ ठाकूर



या वेळी प्रमुख वक्ते दिनेश सासवडे यांनी अण्णा चा जीवनप्रवासाचे वर्णन आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आदर्श लोकांनी घ्यावा असे प्रतिपादन करत कर्मवीरांचे खरे वारसदार म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शब्दसुमनांनी कौतुक केले. या सोहळ्यामध्ये दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. तसेच सीबीएसईच्या विद्यार्थ्यांना विविध बक्षीस देऊन स्नमानीत करण्यात आले.





**पनवेल : भाजप विचुंबे पंचायत समितीचे अध्यक्ष व वांगणीतर्फे वाजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सतीश मालुसरे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या.**

# करावे गावात सणांवर आधारित कवीसंमेलन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**


भारतीय सणांवर आधारित नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवीमुंबई ' संस्थेच्या वतीने मासिक कवीसंमेलन करावेगावातील 'ज्ञानदीप हायस्कूल' येथे पार पडले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जेष्ठ साहित्यिका पाकिजा आत्तार या होत्या. या कविसंमेलन कवी खंडू अडांगळे , मिलिंद कल्याणकर, अश्विनी म्हात्रे, रूपाली शिंगे, सुचित्रा कुंचुमवार, गज आनन म्हात्रे, कोडोलकर यांनी भारतीय सणांवर कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गज आनन म्हात्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुचित्रा कुंचुमवार यांनी केले. या वेळी अनेक काव्यरसिक उपस्थित होते.

## दुखवटा

### अनंत ठाकूर



**मोहोपाडा :** वासांबे मोहोपाडा जि.प.विभागातील लोधिवली येथील अनंत ठाकूर यांचे वयाच्या ५५व्या वर्षी निधन झाले. लोधिवली येथील स्मशान भूमीत त्यांच्यावर शोकाकुळ वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्च्यात दोन मुले व एक भाऊ असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य शनिवारी (दि.२७) लोधिवली येथे राहत्या घरी होणार असून १० वाजता गुरुवर्य ह.भ.प. रामदास (भाई) महाराज पाटील (संस्थापक रायगड पुरस्कृत) यांचे प्रवचन होईल.

# युईएस ज्युनिअर कॉलेजमध्ये प्लॅन्टस् अ‍ॅण्ड फ्लॉवर्स डे



**उरण : वार्ताहर**

युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स अ‍ॅण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीमध्ये प्लॅन्टस् अ‍ॅण्ड फ्लॉवर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला.

प्लॅन्टस् अ‍ॅण्ड फ्लॉवर्स डे चे उद्घाटन लायन्स इंटर नॅशनल क्लबचे जिल्हाधिकारी सुर्यवंशी यांच्या हस्ते झालं. त्यांच्यासोबत लायन्स क्लब उरणचे अध्यक्ष ओहोळ आणि इतर सदस्य तसेच यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, मानद सचिव अ‍ॅड. राजेंद्र भानुशाली, सहसचिव अ‍ॅड. अपूर्वा ठाकूर,सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व पी.टी.ए. सदस्य तसेच प्लॅन्टस्ण्ड फ्लॉवर्स डेच्या इंचार्ज शिक्षिका, शिक्षक आणि विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

प्लॅन्टस् अ‍ॅण्ड फ्लॉवर्स डे च्या प्रदर्शनात विविध प्रकारची पाने, फुले, फळे, भाज्या, धान्य, मोड आलेले कडधान्य, मसाले इत्यादींचा मोठया कल्पकतेने वापर शाळेच्याविदयार्थ्यांनी केला होता व त्यासाठी त्यांना वर्गशिक्षकांचे अमूल्य असे मार्गदर्शन लाभले होते. तसेच ज्यु. कॉलेजच्या विदयार्थ्यांनी विविध फुलांच्या रांगोळ्या, पुष्पगुच्छ तसेच भाज्या व फळांपासून विविध प्रकारचे शोपिस इत्यादी तयार केले होते. तर सीनियर कॉलेजच्या विदयार्थ्यांनी नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनं प्रदर्शनात मांडली होती.

# न्यायालयाचे बनावट शिक्के बनवणाऱ्यांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी पनवेल न्यायालयातील बनावट मायनर दाखला प्रकरणात वकिलापाठोपाठ आणखी दोघांना मुंबईतून अटक केली. या दोघांनी वकिलाला न्यायालयाचे बनावट शिक्के बनवून दिल्याचे उघडकीस आले. मोहम्मद सलीम इलीयाज शेख (४२, रा. भेंडी बाजार), व मोहम्मद मुमताज मकबुल हुसेन (३२, रा. धारावी) अशी या दोघांची नावे असून न्यायालयाने या दोघांची



रवानगी पोलीस कोठडीत केली आहे. वाशीत बांधकाम व्यावसायिक लाधवजी पटेल (वय ५७) यांना उलवे, सेक्टर-१७ मधील जमीन खरेदी व्यवहार पूर्ण करण्यासाठी न्यायालयातून मायनर दाखला घेणे आवश्यक होते. यासाठी पटेल यांनी न्यायालयात अर्जदेखील दाखल केला होता, मात्र प्रक्रिया विलंबाने सुरू असल्याने ओवळे येथे राहणाऱ्या सागर घरत याने एका वकिलामार्फत लवकरात लवकर मायनर सर्टिफिकेट तयार करून १० सप्टेंबर रोजी पटेल यांना न्यायालयीन आदेशाची प्रत दिली होती, मात्र पनवेल येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. ई. कोठळीकर यांची सही व शिक्का असलेल्या या दाखल्याची पनवेल न्यायालयात पडताळणी केली असता, हा दाखला बोगस असल्याचे उघड झाले. त्यानंतर पटेल यांनी आपल्या वकिलामार्फत सागर घरत याला न्यायालयासमोर हजर केले असता, त्याने ही प्रत खारघर येथील अ‍ॅड. व्ही. के. शर्मा यांनी दिल्याचे सांगितले होते.

यानंतर पनवेल शहर पोलिसांनी न्यायालयाची फसवणूक केल्याप्रकरणी अ‍ॅड. व्ही. के. शर्मा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या तपासात अ‍ॅड. व्ही. के. शर्मा याने मोहम्मद सलीम इलीयाज शेख व मोहम्मद मुमताज मकबुल हुसेन या दोघांकडून न्यायालयाचे बनावट शिक्के बनवून घेतल्याचे उघडकीस आले.

पोलिसांनी या दोघांना अटक केली. या दोघांनी एका अपंग व्यक्तीकडून शिक्के बनवून घेतल्याचे आढळले असून त्यालादेखील नोटीस बजावण्यात आल्याची माहिती स.पो.नि. सचिन पोवार यांनी दिली.



**पनवेल : मुंबई विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' मोखाडा येथील रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य, सामाजिक उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले आहे. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एन. चांदोरे, उपप्राचार्य डॉ. एस. जी. मेंगाळ, प्राध्यापक व्ही. एम. मोरे, प्राध्यापक ए. डी. वरठा, प्राध्यापक एस. आर. व्हांडे, प्राध्यापक टी. एम. पराडके, प्राध्यापक पी.टी.भोये उपस्थित होते.**

# कामोठेमधील प्रलंबित पेट्रोल पंप लवकर सुरू करा; भाजपची मागणी



**पनवेल : वार्ताहर**

कामोठे शहरामधील गेली तीन वर्षांपासून प्रलंबित असलेला पेट्रोल पंप हा लवकरात लवकर चालू व्हावा या हेतूने कामोठे मंडळ भाजपाच्या सर्व पदाधिकारी यांनी सेक्टर १८ येथे स्थित पेट्रोल पंपची पाहणी केली.

या वेळी मंडळ अध्यक्ष विकास घरत आणि समाजसेवक रवी गोवारी यांनी पेट्रोल पंपचे मालक यांच्याशी फोन वर बोलून सर्व समस्या समजावून घेतल्या आणि त्या समस्यांवर उपाय म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको, वन विभाग (CRZ) आणि पनवेल महानगरपालिका यांच्यासोबत बैठक घेऊन हा पेट्रोल पंप कामोठेच्या नागरिकांसाठी कसा लवकरात लवकर चालू करण्यात येईल यावर चर्चा झाली. लवकरात लवकर या विषयावर तोडगा काढून पेट्रोल पंप कामोठे शहरातील नागरिकांच्या सेवेत रुजू करण्यात येईल, अशा विश्वास कामोठे मंडळ भाजपच्या सर्व पदाधिकारी यांनी दिला.

# न्हावे विद्यालयात कर्मवीर जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल न्हावे विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३८वा जयंती सोहळा संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाला.



जयंती सोहळ्याचे औचित्य साधून संस्थेमार्फत देण्यात आलेल्या दोन इंट्रॅक्टिव्ह पॅनेलचे उद्घाटन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख व्यक्ती म्हणून संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी.बी. पाटील, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार माधव, विश्वनाथ कोळी, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सी.एल. ठाकूर, माजी सरपंच हनुमान भोईर, माजी उपसरपंच संजय ठाकूर, मीनाक्षीताई पाटील, सी.एल.ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सुनिता भोईर, जागृती म्हात्रे आणि अनिशा पाटील, ग्रामसुधारक मंडळाचे अध्यक्ष योगेश पाटील, माझी अध्यक्ष गजानन म्हात्रे, किशोर घरत, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर म्हात्रे, नुरा शेख, प्रा. पाठवले सर आदी उपस्थित होते.

अरुणशेठ भगत यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यालयाच्या वाढत्या पटसंख्याबरोबरच भौतिक सुविधा वाढवून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवल्याबद्दल कमिटी व सेवकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक माजी सरपंच राजेंद्र म्हात्रे यांनी केले तर सूत्रसंचालन रयतचे लाईफ मेंबर मुख्याध्यापक प्रमोद कोळी यांनी व आभार नुरा शेख यांनी मानले.





**पनवेल : मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळ यांच्या वतीने झंकार नवरात्रोत्सव २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे या उत्सवाचे २०वे वर्ष आहे. त्यानुसार मंगळवारी दुसऱ्या दिवशी दांडीया रसीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पनवेल शहर युवामोर्चा अध्यक्ष सुमीत झुंझारराव, संजय जैन, स्वाती कोळी आदी उपस्थित होते. दरम्यान, पहिल्या दिवसाच्या विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देऊन गौरविण्यात आले.**

# 'जागर अभिजात मराठी'त सीकेटी कॉलेजचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बोरीवली येथे ३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या जागर अभिजात मराठीचा या कार्यक्रमामध्ये पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातर्फे 'आख्यान ए झुरळ' ही एकांकिका सादर होणार आहे. यामध्ये गणेश जगताप, अभिजित झुंजारराव यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

दरम्यान, कार्यक्रमात ईशस्तवन, नाट्यसंगीत, मराठी भाषा वाचन स्पर्धा, भारत माता वंदना, लावणी नृत्य, कलाकार संगीत खुर्ची असेही कार्यक्रम होणार आहेत.



**पनवेल : भाजपच्या नवीन पनवेल मंडळ सदस्यपदी चंद्रकांत सोनावणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चंद्रकांत सोनावणे यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. चंद्रकांत सोनावणे यांचे गेल्या ४० वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात मोलाचे योगदान ठरले आहे. यामुळे त्यांचा समाजभुषण व जीवनगौरव पुरस्काराने गौरव झाला आहे. त्यांनी भीमशक्ती या सामाजिक संस्थेचे रायगड जिल्हा प्रभारीपदही भूषविले आहे.**



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तसेच भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ग्रामपंचायत चिपळे येथील जलजीवन मिशन योजनेच्या जॅकवेलच्या पहिल्या स्लॅबचे काम बुधवारी सुरू करण्यात आले. या वेळी भाजप नेरे जिल्हा परिषद अध्यक्ष सुनील पाटील, भाजप युवा मोर्चा पनवेल तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, माजी उपसरपंच मुकेश फडके, भाजप विहिघर बूथ अध्यक्ष अक्षय पाटील, ग्रुप ग्रामपंचायतमधील भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी खुटूकबांधण (वाडा), इनामपुरी येथील नवदुर्गा मित्र मंडळाच्या देवीचे दर्शन घेतले. या वेळी भाजप युवा नेते शुभ पाटील उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची शैक्षणिक क्षेत्रभेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.२३) रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या आय. टी. व संगणकशास्त्र विभागाने एम.के.सी.एल., नेरूळ येथे शैक्षणिक क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते. या क्षेत्रभेटीत द्वितीय वर्षाचे एकूण ५३ विद्यार्थी सहभागी झाले होते.



या क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील चालू घडामोडी, एंटरप्राइज आयटी इन्फ्रास्ट्रक्चर, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स आणि वर्गात शिकवले जाणारे संकल्पना प्रत्यक्ष जगात कशा प्रकारे वापरल्या जातात याचे प्रात्यक्षिक समजावून देणे हा होता. एम.के.सी.एल.च्या तांत्रिक मार्गदर्शनासाठी इंजिनीअरिंग मॅनेजर आनंद कुलकर्णी, सिनिअर सोल्युशन आर्किटेक्ट मीनल घाडे, सिनिअर सोल्युशन आर्किटेक्ट राजेश साटम, एमकेसीएलचे समन्वयक मयुर हवालदार हे अधिकारी उपस्थित होते.

या क्षेत्रभेटीचे प्रमोशन आय लाईक (जिल्हा रायगड) समन्वयक विश्वास मते यांनी केले. या शैक्षणिक क्षेत्र भेटीमध्ये विद्यार्थ्यांसोबत प्रा. महेश धायगुडे, प्रा. मनीषा शिलेदार व प्रा. सर्वेश महाजन हे उपस्थित होते. या उपक्रमासाठी सतत प्रोत्साहन व मार्गदर्शन दिल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे विशेष आभार कम्प्युटर सायन्स व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागाच्या वतीने मानण्यात आले. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागप्रमुख प्रा. राजश्री म्हात्रे व प्रा. रिझवाना मोमीन विभाग प्रमुख कम्प्युटर सायन्स यांचे नेतृत्व व सहकार्यदेखील मोलाचे ठरले.

या शैक्षणिक क्षेत्रभेटीच्या कार्यक्रमासाठी उत्कृष्ट समन्वयन प्रा. निलम मोरे, प्रा. सोनी पांडे, प्रा. गीता ठाकूर, प्रा. विवेक गरजे व प्रा. शिवानी सोनकार यांनी केले. ही शैक्षणिक क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरली तसेच त्यांनी उद्योग व शिक्षणातील अंतर कसे कमी करता येते हे प्रत्यक्ष अनुभवले. तांत्रिक ज्ञानासोबतच नवकल्पनांची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळाली व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी नवीन दृष्टिकोन प्राप्त झाला. या शैक्षणिक भेटीसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# खांदेश्वर पोलीस ठाण्याला बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय, न्यू पनवेल येथे प्रॅक्टिकल ट्रेनिंग - I चा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून तृतीय वर्ष बी.ए. एलएलबीच्या सुमारे ४५ विद्यार्थ्यांनी २३ सप्टेंबर २०२५ रोजी खांदेश्वर पोलीस ठाणे, खांदा कॉलनी, न्यू पनवेल येथे शैक्षणिक भेट दिली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याच्या दैनंदिन कामकाजाची प्रत्यक्ष ओळख करून देणे हा होता.

ही भेट विषय सहाय्यक प्राध्यापक सूरज भालेराव व सहाय्यक प्राध्यापक अखनम मेहंदीकर यांनी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली होती. भेटीची सुरुवात पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या स्वागत व माहितीपर मार्गदर्शनाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना पोलीस विभागाची रचना, पदानुक्रम व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पार पाडल्या जाणाऱ्या महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या विषयी माहिती दिली.

यानंतर विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याच्या विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून घेण्यात आली. यात रिसेप्शन, महिला सहाय्य कक्ष तसेच जप्त वस्तू संग्रह कक्षाचा समावेश होता. पुराव्याची शृंखला (Chain



of Custody), पुराव्याची शुचिता टिकवून ठेवण्याचे महत्त्व तसेच अटक व कोठडी प्रक्रिया विषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

या वेळी पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत सायबर गुन्हे, कायदेशीर प्रक्रिया आणि पोलिसी कार्यातील विविध आव्हानांवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी कायद्याचे राज्य, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि सार्वजनिक सुरक्षेतील संतुलन यावर उत्स्फूर्त चर्चा केली.

या शैक्षणिक भेटीमुळे भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वर्गातील सैद्धांतिक ज्ञानाचे प्रत्यक्ष व्यवहाराशी नाते जोडण्याची संधी मिळाली.

## मृतदेह आढळला

**पनवेल :** मागील २० दिवसांपासून बेपत्ता असलेले पोलीस शिपाई सोमनाथ फापाळे यांचा शोध घेत असलेल्या विशेष पोलीस तपास पथकाला कळंबोली येथील मार्बल मार्केटजवळच्या खाडीत एका अज्ञात व्यक्तीचा पूर्णपणे कुजलेल्या अवस्थेतील मृतदह मृतदेह सापडला आहे.

हा मृतदेह बेपत्ता पोलीस शिपाई सोमनाथ फापाळे यांचा असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार पोलिसांनी हा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून दिला आहे. रबाळे पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई सोमनाथ फापाळे यांची ४ सप्टेंबर रोजी रात्री वाशी येथे झोन वन स्ट्रायकिंगच्या गाडीवर ड्यूटी होती. सकाळी ७.३० वाजता ड्यूटीवरून सुटल्यानंतर फापाळे हे कळंबोली येथे घरी जात असल्याचे सांगून निघून गेले होते. तेव्हापासून ते बेपत्ता आहेत.

## संपादकीय

# ट्रम्प नव्याने वादात

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची धक्कादायक विधाने आणि दावे आता जगासाठी नवीन राहिलेले नाहीत. परंतु आरोग्यक्षेत्राशी संबंधित त्यांच्या नव्या दाव्याने जगभरात खळबळ माजली आहे. गर्भवती महिलांनी टायलेनॉलचे (पॅरासिटामॉल किंवा एसिटामिनोफेन) सेवन केल्यास बाळाला ऑटिझमचा धोका संभवतो. त्यामुळे अमेरिकन डॉक्टरांनी गरोदर महिलांना टायलेनॉल देऊ नये असा सल्ला लवकरच त्यांना दिला जाईल असे विधान ट्रम्प यांनी नुकतेच केले. या विधानामुळे ट्रम्प यांच्यावर अमेरिकेत टीका होतेच आहे. पण जगभरातही या विधानाने तणाव निर्माण झाल्याचे दिसते.

**टायलेनॉल हे एक ओव्हर-द-काऊंटर विकता येणारे म्हणजे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळणारे वेदनाशामक औषध आहे. त्यातील क्टिव्ह घटक एसिटामिनोफेन असून त्याला जगभरात इतरत्र पॅरासिटामॉल म्हणतात. अमेरिकेबाहेर हे औषध पॅरासिटामॉल म्हणूनच ओळखले जाते. हे औषध अनेक निरनिराळ्या ब्रँडच्या नावांनी विकले जाते. लहान मुलांसाठी किंवा नवजात बालकांसाठीही हेच घटक असलेली परंतु वेगळे प्रमाण असलेली औषधेही उपलब्ध असतात. ताप आल्यावर किंवा वेदनाशामक म्हणून पॅरासिटामॉलचा वापर घराघरातून केला जातो. भारतीय लोक तर थोड्या वेदना जाणवल्या तरी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय पॅरासिटामॉल घेतात. एसिटामिनोफेनच्या ऑटिझमशी असलेल्या संबंधाबाबत काही दावे यापूर्वीही केले गेले असले तरी अद्याप कोणतीही निर्णायक माहिती उपलब्ध नसल्याचे व याविषयी संशोधन सुरू असल्याचे तज्ज्ञ सांगतात. असे असताना ट्रम्प यांनी या औषधाबाबत हा दावा केल्याने जगभरात खळबळ माजली आहे. ट्रम्प यांनी आपल्या आरोग्य सचिवांच्या समवेत ही घोषणा केली. जगभरातील प्रमुख वैद्यकीय संघटनांच्या मते हे औषध गरोदर महिलांसाठी सुरक्षित आहे. अर्थात गरोदर महिलांना कोणतेही औषध घेण्यापूर्वी डॉक्टरांचे मार्गदर्शन घेण्याचा सल्ला दिला जातो. ऑटिझम ही अत्यंत गुंतागुंतीची समस्या असून जगभरातील मुलांमध्ये तिचे प्रमाण वेगाने वाढताना दिसत असल्यामुळे जगभर याविषयी चिंतेचे वातावरण आहे. ऑटिझम नेमका कशामुळे होतो याविषयी जगभरात संशोधन सुरू आहे. अमेरिकेच्या आरोग्य सचिवांनी ऑटिझमचे कारण निश्चित करण्यासाठी पुढील पाच महिन्यांत मोठ्या प्रमाणात चाचण्या आणि संशोधन केले जाईल असे आश्वासन एप्रिल महिन्यात दिले होते. ऑटिझम ही एक स्पेक्ट्रम डिसऑर्डर म्हणजे टोकाची कमी-जास्त तीव्रता असणारा विकार असून अनुवांशिक आणि पर्यावरणीय घटकांच्या एकत्रित परिणामातून ऑटिझम होत असावा असे तूर्तास मानले जाते. परंतु ट्रम्प यांच्या ताज्या वादग्रस्त विधानामुळे गरोदर महिलांनी पॅरासिटामॉल घ्यावी की नाही याबाबतची चर्चा जगभरात सुरू झाली आहे. खूप ताप आला तरच गरोदर महिलांनी पॅरासिटामॉल घ्यावी असे देखील ट्रम्प यांनी म्हटले आहे. वैद्यकीय देखरेखीखाली आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पॅरासिटामॉल गर्भधारणेदरम्यान वापरण्यास सुरक्षित आहे असे आपल्या देशात आणि अमेरिकेतही मानले जाते. गर्भवती महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पॅरासिटामॉल घेतल्यानंतरही ऑटिझम होऊ शकतो असे दाखवणारा कोणताही वैज्ञानिक पुरावा आजपर्यंत उपलब्ध झालेला नाही असे भारतातील मान्यवर डॉक्टरांनी या वादावर म्हटले आहे. ट्रम्प यांनी हा खळबळजनक दावा कसा काय केला याविषयी आश्चर्य व्यक्त केले जाते आहे. अधिक प्रमाणात पॅरासिटामॉल घेतल्याने यकृतावर वाईट परिणाम होतो हे मात्र सर्वज्ञात आहे. यापूर्वी लहान मुलांच्या लसीकरणातून ऑटिझम होत असल्याचे दावे केले गेले आहेत. परंतु त्यासंदर्भातही ठोस पुरावे समोर आलेले नाहीत.**

# तळा गावचे प्राचीन श्रद्धास्थान श्री चंडिका देवी

निसर्गरम्य अशा तळगडाच्या पायथ्याशी छत्रपती शिवरायांनी राज्यभिषेकाचे निमंत्रण दिलेल्या रायगड जिल्ह्यात जास्त वतने श्री चंडिका मातेला आहेत. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत आजही ग्रामदेवतेचा अध्यात्मिक वारसा मोठ्या भक्तिभावाने जोपासला जातो.

चंडिका देवी मंदिर तळा गावचे प्राचीन श्रद्धास्थान आहे. तेथे चिरंतन मुल्ये जपली जात आहेत . तळ्याची श्री चंडिका देवी ग्रामदेवता आजही नवसाला पावणारी आहे. या मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात असून या कालावधीत देवीचा दर्शनासाठी भक्तगण दुरदुरुन येत असतात नवरात्रात यज्ञ समजून घेतला तर यज्ञाच्या प्राचीन मूल्याची अतिशय बुद्धिगम्य माहिती समजते. सर्व वतनदार,बलुतेदार यज्ञाचे सामान गोळा करून एकत्रित होतात. वैरभाव असेल तर ते दूर होऊन त्यांच्यात मैत्री निर्माण होते. यज्ञात हवन केल्यानंतर तो शेष भाग प्रसाद म्हणून स्वीकारतात.



हि शेकडो वर्षाची परंपरा आजही तळा ग्रामस्थांनी टिकवून ठेवली आहे. या मंदिराच्या परिसरात प्रवेश केला की शांती लाभते. समाजातील सर्व स्तरातील नागरिक विषमता विसरून देवीच्या चरणाजवळ येतात. मंदिरात सामूहिक आरती करतात या मंदिराची भव्यता शांतता व स्वच्छता यांचा संगम येथे पाहवयास मिळतो.

श्री चंडिकामाता हि माहिषासुर मर्दिनी असून तळा येथील मूर्ती महिषासुराचा पाठीवर एक पाय देऊन देवी उभी आहे. या मंदिरात पूर्वीपासून नवरात्रोत्सव मोठ्या उत्सहात साजरा होत आहे. नवरात्रोत्सवात कामे वातनंदाराना वाटलेली असत. ते मोठ्या हौशीने व जबाबदारीने कामे पार पाडतात.

कुंभार घट, माती घेऊन येतो, बुरुड परड्या घेऊन व पंखा घेऊन येतो. वाणी अठरा प्रकारचे धान्य घेवुन येतो. धान्य पेरली जातात. दिव्यासाठी तेल आणले जाते. यजमान पूजा साहित्य आणतात मंत्र जागरात घटस्थापना होते. घटाभोवती मातीत धान्य पेरली जातात, घटामध्ये पाणी टाकून त्यावर परडी ठेवतात शिंप्याने आणलेले वस्त्र परडीवर ठेवल्यावर नारळ ठेवला जातो नंतर तिळाच्या फुलांची माळ चढवली जाते.

त्यावेळी इतर वतनदार उपस्थीत राहून आपल्या कामाचा वाटा उचलतात. दररोज गोंधळाची कवने देवीसमोर म्हंटली जातात आजही सामूहिक यज्ञ केला जातो .

अडचणींचा वेळी १२ वाड्यांचे गावकी एकत्र येउन निर्णय घेतात. सुख दुःखाच्या वेळी देवीची ओटी भरली जाते. दररोज नवीन साडी चोळी व दागिन्यांनी सुशोभित करतात या नऊ दिवसात गावातील ग्रामस्थ राजकीय नेते तसेच मुंबई पूणे संपूर्ण तालुक्यासह जिल्ह्यातील भक्त याठिकाणी आवर्जून देवीच्या दर्शनासाठी येतात. दररोज सात ते आठ च्या सुमारास सांजपूजा व आरती होते.यावेळी पंचपदीही म्हटली जाते .मंदिरात भजन व जागरण करण्यासाठी प्रत्येक वाडीला तिथी नुसार नियोजन केले आहे.त्यानुसार प्रत्येक वाडीचे भजन होते. अष्टमीच्या दिवशी शतचंडीचा जप नवचंडी यज्ञ होतो. यज्ञाची सर्वकामे वाटून दिल्याप्रमाणे व्यवस्थित पार पाडतात. दसऱ्याला तर भक्तांची दर्शनासाठी रात्री उशिरपर्यंत गर्दी असते. नवरात्रोत्सवात तळ्याबरोबर संपूर्ण महाराष्ट्रातून भवानी देवीचे भक्त येथे दर्शनासाठी येतात.त्याचबरोबर अनेक प्रमुख राजकीय नेते निवडणुकी पूर्वी प्रथम चंडीकामातेचे दर्शन घेतात.

**-संध्या पिंगळे-ठाकूर**, तळा

# चौल आंबेपुरी पाखाडीची शितळादेवी

अलिबाग तालुक्यातील चौल या दक्षिणेकडील प्राचीन नगरात हिरव्या गर्द नारळ पोफळीच्या छायेत चौलनाका ते आग्राव जोड रस्तावर चौलच्या आंबेपुरी पाखाडीत शितळादेवीचे भव्य दिव्य देवालय आहे. मंदिर बांधले त्यावेळी दक्षिणेला चौलची खाडी होती. जाता जवळपासच्या परिसरात भर घालून खाडीवरती घरे व नारळी-पोफळीच्या बागा अस्तित्वात आणलेल्या आहेत. या मंदिरास पौराणिक कथासार आहे.

सागरतीरावील चंपावतीनगरीत देवीची उपासक असलेली सुंदर, सुशील, निर्मळ, उदार, धर्मशील, कोमल, मनाची चंपावती राणीचे राज्य होते. चंपावती नगराला समुद्राचा वेढा होता, समुद्राच्या लाटांने चंपावती नगरीची तटबंदी सारखी तुटून नुकसान होत असे. समुद्राचे पाणी येण्याचे संकट दरवर्षी येत होते. त्यामुळे राणी हतबल होऊन दुःखी होई. चंपावती राणीचा दिवसरात्र प्रजा व राज्य यांच्या चिंतेत जाई. महासागरापुढे काय करावे असा प्रश्न सातत्याने राणीच्या मनात निर्माण होई. बरेच दिवस लोटल्यावर राणीने एकांतात अनुष्ठानास आरंभ केला. मौन व्रत पाळून देवीच्या उपासनेला सुरूवात केली. असे नवरात्रीतील आठ दिवस गेले, राणीच्या उपासना व्रताला यश आले. शीतळामाता प्रत्यक्ष प्रकट होऊन राणीला म्हणाली, चंपावती काय संकट आहे, सागरावर माझी सत्ता आहे मला शितळामाता म्हणतात. त्यावर राणीने सागरापासून होणा-या त्रासाबद्दलची कहाणी देवीला कथन केली. या सागराच्या संकटापासून नगरीचे रक्षण कर असे सांगताच देवीने क्षणही न घालविता माझे शक्तीने सागराला



शंत करीत असे म्हणत हाततील तुंबर सागरावर फेकला व सागर अडविला. सागर भयभीत होऊन शितलामातेला शरण आला व यापुढे या नगरीला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही असे वचन सागराने देवीला दिले व शितळामातेला राज्य करण्यासाठी सिंहासनी बसवले पुजापात्र घेऊन मातेची पुजा करून निर्मळ गंगाजळ, हळद, कुंकू, आभुषणे, कनक, वस्त्र, श्रीफळ अर्पण केले.

त्यापासून देवीचे स्थान या चंपावतीनगरीत निर्माण झाले. शितलामातेला दरबार देवदेवतेचे माहेरघर आहे देवदेवता मातेच्या दर्शनासाठी येऊ लागल्या अशी पौराणिक कथा सांगितली जाते.

या मंदिराचा प्रथम जिर्णोध्दार इ.स. १५८ मध्ये बाबूभट उपाध्ये यांनी द्रव्य मिळवून केल्याची नोंद आहे. इ.स. १७६७ मध्ये विसावी सरसुभेदार यांनी ब्राम्हण भोजन घातले. १७८५ मध्ये एप्रिलच्या सुमारास राघोजी आंग्रे कुटूंब देवीच्या दर्शनास आले होते. तर १७९२ च्या ऑक्टोबर महिन्यात मुलाबद्दलचा नवस फेडण्यासाठी आले होते. त्याप्रसंगी हत्ती, घोडे, संरजाम व काही लष्कर बरेच दिवस तळ ठोकून या ठिकाणी राहिले आहे. १८०५ मध्ये बाबूराव आंग्रे दर्शनाला आल्याचा उल्लेख असून दरवर्षी दस-याच्या दिवशी आंग्रे कुटूंब दर्शनाला न चुकता येई व देवीच्या रक्षकाचा मान देत असत. पुर्वीचे आंग्रेकालीन लाकडी कौलारू मंदिर पाडून त्या वास्तुतील मुर्तीची जागा न बदलता ग्रामस्थांनी जीर्णोध्दार समिति नेमून नवीन वास्तू बांधली मार्च १९९७ मध्ये रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी रघुनाथ राठोड यांचे हस्त उद्धाटन करण्यात आले.

ही देवता महाराष्ट्रातील नव्हे तर अन्य प्रांतातील अनेक कुटूंबांची कुलदैवत आहे येथे भाविक लोक येऊन कौल लावतात. श्री गोळबादेवी, भरडादेवी, या तिच्या उपदेवता आहेत. याजागृत देवस्थानास भेट देण्यासाठी असंख्य भाविक नियमित येत असतात.

**-महेंद्र खैरे**, रेवदंडा



## बदलते तंत्रज्ञान

# तुमचाही फोन हँग अथवा स्लो चार्ज होतो?

आजकाल स्मार्टफोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. प्रत्येकालाच त्यांचे फोन जास्त काळ सुरक्षित आणि स्वच्छ राहावेत असे वाटते. म्हणूनच, लोक फोन खरेदी करताच स्क्रीन गार्ड आणि बॅक कव्हर बसवतात. बहुतेक लोकांना असे वाटते की कव्हर त्यांच्या फोनला ओरखडे आणि फुटण्यापासून वाचवते, परंतु फार कमी लोकांना माहिती आहे की कव्हर घालण्याचे अनेक तोटे देखील आहेत.



फोन गरम होतो-फोन कव्हरचा सर्वात मोठा तोटा म्हणजे गरम होण्याची समस्या. फोन दबला गेल्याने त्याची उष्णता बाहेर पडू शकत नाही. विशेषतः उन्हाळ्यात, फोन जास्त गरम होतो, ज्यामुळे फोन हँग होणे, स्लो चालणे आणि जलदगतीने बॅटरी संपणे यासारख्या समस्या उद्भवतात.

चार्जिंग समस्या-कव्हर लावून फोन चार्ज केल्याने बॅटरी चार्ज होण्याची गती कमी होते. कारण फोनमधील उष्णता बाहेर पडत नाही, ज्यामुळे तो जास्त गरम होतो. जास्त वेळ असेच सुरू राहिल्यास बॅटरीचे आयुष्य देखील कमी होऊ शकते.

नेटवर्क आणि सिग्नलवर परिणाम-जाड आणि घट्ट कव्हर कधीकधी फोनच्या नेटवर्क अँटेना आणि सेन्सर्सना ब्लॉक करू शकतात. यामुळे वायरलेस नेटवर्क सिग्नल कमकुवत होऊ शकतात आणि कॉल गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. मोबाइल डेटा स्पीड देखील कमी होऊ शकतो.

चुंबकीय कव्हर समस्य-जर तुमचे कव्हर चुंबकीय असेल तर ते GPS आणि कंपास सारख्या घटकांवर परिणाम करू शकते. यामुळे लोकेशन ट्रॅकिंग योग्यरित्या काम करू शकत नाही.

बॅक्टेरियाचा धोका-जर फोन कव्हर चांगल्या दर्जाचे नसेल तर त्यात धूळ आणि बॅक्टेरिया जमा होऊ शकतात. यामुळे फोनच्या मागील पॅनलला नुकसान होऊ शकते आणि स्वच्छतेच्या समस्या उद्भवू शकतात. घाण कव्हरचा दीर्घकाळ वापर आरोग्यासाठी देखील हानिकारक असू शकतो.

फोनची रचना झाकली जाते

आजकाल कंपन्या आकर्षक फोन डिझाइन आणि बॅक पॅनल तयार करतात. दरम्यान, कव्हर घातल्याने फोनचा मूळ लूक आणि फील खराब होऊ शकतो.

# प्रतिभावान कवी अरुण कोलटकर

अरुण बालकृष्ण कोलटकर हे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांत कविता करणारे भारतीय कवी होते. कोलटकरांचा आज स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर १९३२ रोजी कोल्हापुरात झाला. त्यांचे शालेय शिक्षण तेथील राजाराम माध्यमिक विद्यालयात झाले. मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे पदवीधारक असलेले कोलटकर एक उत्तम ग्राफिक्स डिझायनर व जाहिरात क्षेत्रातील अत्यंत यशस्वी कलादिग्दर्शक होते. १९५०-१९६० च्या दशकांत त्यानी लिहिलेल्या कविता या मुंबईतील विशिष्ट बोली मराठीतल्या असून त्यात मुंबईत आलेल्या निर्वासितांच्या व गुन्हेगारांच्या जीवनाचे दर्शन घडते.




## निमित्त

मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत १९५५ पासून कविता लिहिणार्या अरुण कोलटकरांची २००२ पर्यंत, म्हणजे सत्तेचाळीस वर्षांत 'जेजुरी' (१९७६) आणि 'अरुण कोलटकरच्या कविता' (१९७७) अशी अवघी दोन पुस्तकं प्रकाशित झाली होती. मात्र, कोलटकर गेले त्या एकाच वर्षात, २००४ मध्ये, त्यांची पाच पुस्तकं आली. मराठीत 'भिजकी वही' आणि 'द्रोण', इंग्रजीमध्ये 'काला घोडा पोएम्स' आणि 'सर्प सत्र', 'द पोलीसमन : अ वर्डलेस प्ले इन थर्टिन सीन्स' या पुस्तकाच्या रूपाने कोलटकरांची रेखाचित्रकार म्हणून नवी ओळख झाली. २००५ मध्ये 'न्यूयॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स'च्या अभिजात पुस्तकांच्या मालेत कोलटकरांच्या 'जेजुरी'ची आंतरराष्ट्रीय आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्याच्या पुढल्या वर्षी 'अरुण कोलटकरांच्या चार कविता' हे मराठी कवितांचं छोटं पुस्तक आलं. २००९ मध्ये प्रासनेच 'बोटराईड ॲन्ड अदर पोएम्स' हा इंग्रजी कवितांचा संग्रह काढला. २०१० मध्ये इंग्लंडमधल्या ब्लडॅक्स बुक्सने कोलटकरांचं सुमारे पावणेचारशे पानांचं 'कलेक्टेड पोएम्स इन इंग्लिश' प्रसिद्ध केलं. त्यात मराठी कवितांच्या अनुवादांसोबतच त्यांनी संतांच्या कवितांचे केलेले अनुवादही समाविष्ट आहेत आणि २०११ मध्ये प्रासने कोलटकरांच्या दफ्तरात सापडलेला 'जेजुरी'चा मराठी खर्डा पुस्तकरूपाने प्रकाशित केला.

कोलटकरांची कविता ही सगळ्या मराठी समीक्षेला, रसिकतेला, आस्वादकतेला आव्हान देत समोर उभी राहते आणि तेही, हा आव्हानाचा आवेश मुळीच न पांघरता. चांगली प्रतिमांकित भावकविता वाचताना वाचक कवितेतील भावप्रतिमांच्या मनावर उमटणार्या ठशांतून कवितेच्या अर्थाची संगती लावण्याचा प्रयत्न करतो. कवितेत एका थंड, अलिप्त शैलीत त्या वास्तवाचं कथन सुरू राहातं. कोलटकरांनी ज्या काही थोड्याथोडक्या मराठी कविता लिहिल्या, त्या सामान्य काव्यरसिकांच्या आकलनकक्षेच्या परीघावर राहून शक्य वाटणारं आव्हान देत राहतात. बाकी बहुतांशी अनाकलनीयच; पण त्यांच्या कवितेने एकूण मराठी कवितेला अभिव्यक्तीची एक कोरी करकरीत वाट दाखवली. नजरही पोचू नये अशी ही वाट; पण कोलटकरांच्या प्रतिभेचा अश्व तिथे दिमाखाने वावरला.

हा कवी आपली अस्सल कलावंताची नैसर्गिक आत्मरत वृत्ती जपत, सतत स्वतः चा आणि आपल्या कवितेच्या वाटेचा शोध घेत राहिला. अशा या प्रतिभावान कवीचे २५ सप्टेंबर २००४ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# छातीत जळजळ होण्यामागे 'हे' असू शकते कारण

चांगल्या पाचन क्रियेमुळे प्रकृती तंदुरुस्त राहते. खराब पाचन क्रियेमुळे संपूर्ण आरोग्यावर वाईट परिणाम होतो. ज्यावेळी खाणं व्यवस्थित पचत नाही, त्यावेळी पोषक तत्व सुद्धा शरीराला पूर्णपणे मिळत नाहीत. खराब पाचनक्रियामुळे आरोग्यासंबंधी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. काही लोकांना सतत एसिडिटी होत असते. त्यामुळे आंबट ढेकर, छातीत जळजळ अशा समस्या निर्माण होतात. जर, नेहमीच असा त्रास होत असेल, तर काही गोष्टींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.



पोटात आधीपासून एसिड असतं. खाण पचवण्यात हे एसिड मदत करतं. पण काही चुकांमुळे शरीरातील एसिडच प्रमाण वाढतं. त्यामुळे छातीत जळजळ, आंबट ढेकर येऊ लागतात. काहीवेळा औषधांच सेवन आणि प्रेग्नेंसीमुळे सुद्धा एसिडिटी होऊ शकते. जर एसिडिटी सतत होत असेल, तर यामागे काय कॉमन कारण आहे ते जाणून घ्या.

**ॲसिडिटी का चाळवते?**

जे काही आपण खातो ते पचवण्यासाठी फिजिकल एक्टिविटी आवश्यक आहे. जर जेवल्यानंतर तुम्हाला बसून राहण्याची किंवा झोपून जाण्याची सवय असेल, तर त्यामुळे सुद्धा एसिडिटी चाळवू शकते.

**रात्री जेवल्यानंतर काय टाळलं पाहिजे?**

जेवल्यानंतर तुम्ही लगेच चहा-कॉफी पीत असाल, तर एसिड रिफलेक्सची समस्या निर्माण होऊ शकते. खासकरुन रात्री जेवल्यानंतर चहा-पाणी पिणं टाळा. अन्यथा अडचण येऊ शकते.

**एसिड रिफलक्स**

रात्री एसिड रिफलक्स होण्यामागे दोन कारणं असू शकतात. एक उशिरा जेवण त्यानंतर लगेच झोपणं. दुसरं चुकीच्या पोजीशनमध्ये झोपणं. रात्री पोटावर झोपल्यास एसिड रिफलक्सचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे छातीत जळजळ होऊ शकते.

**का ॲसिडिटी वाढते?**

खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या आहेत. त्याचा थेट परिणाम पचनावर होतो. जास्त जंक फूड, मसालेदार तळलेलं खाणं, जास्त चहा-कॉफीच सेवन अशा गोष्टींमुळे सुद्धा एसिडिटी वाढते.

# बनावट नोटांचा छापखाना उघडकीस; तिघांना अटक

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील गोरेगाव परिसरात भारतीय चलनात बनावट नोटा उतरवणाऱ्या टोळीचा गोरेगाव पोलिसांनी मोठा पर्दाफाश केला आहे. गुप्त माहितीच्या आधारे शनिवारी झालेल्या कारवाईत तब्बल ३.८० लाख रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. गोरेगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून संशयास्पद हालचाली व बनावट नोटांच्या अफवा पसरत होत्या. त्यानंतर पोलिसांनी आखलेल्या सापळ्यातून हे रॅकेट उध्वस्त करण्यात यश आले.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला गोरेगाव परिसरात बनावट नोटा चलनात उतरवल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी विविध भागात छापा टाकून टोळीला जेरबंद केले. या कारवाईत आरोपींकडून मोठ्या प्रमाणात बेगडी नोटा तसेच नोटा छपाईसाठी वापरले जाणारे संगणक, प्रिंटर, सॉफ्टवेअर आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले.

मुख्य आरोपी मुशर्रफ अली सत्तार अली अब्दुल रशिद याच्याकडून सर्वाधिक रकमेच्या बनावट नोटा सापडल्या. त्याने सहकारी सुलीमन चाकणकर, मेहबूब उर्फ नवीम आणि आणखी दोन साथीदारांच्या मदतीने विविध गावांमध्ये बनावट नोटा पुरवण्याचा प्रयत्न केला होता. रविवारी (ता. २१) उशिरा याबाबत गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. अटक आरोपींमध्ये मुफस्सिर उर्फ मिनी अब्दुल राशिद (रा. टेमगाव, ता. माणगाव), सुनिल बाळाराम मोरे (रा. निगडी, म्हसळा), मेहबूब उलडे (रा. बोर्लीपंचतन, ता. श्रीवर्धन) यांचा समावेश असून इतर दोन साथीदारांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माणगाव टिएमसी कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

**माणगाव: प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगावमध्ये बुधवार दि.२४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात एन.एस.एस.गीताने करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या उपजिल्हा रुग्णालय माणगावच्या समुपदेशिका रंजिता खेडेकर यांनी एच.आय.व्ही. / एड्स कसा होतो, त्याची कारणे आणि त्याबाबत काळजी कशी घ्यावी या विषयी सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर अध्यक्षीय समारोपामध्ये मध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अमृता देशमुख यांनी एनएसएस दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा देऊन एचआयव्ही एड्स सारख्या आजाराविषयी जागरूक राहावे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.जगदीश शिगवण यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांसमोर मांडली व राष्ट्रीय सेवा योजनेतून एखादा युवक कसा घडतो हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पटवून दिले. यानंतर महाविद्यालयाच्या रेड रिबन क्लब द्वारे आयसीटीसी सेंटर उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे भेट देण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमास आरती राजपूत, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि ८७ विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एसवायबीकॉमची विद्यार्थिनी राखी मोरे यांनी तर आभारप्रदर्शन वैभवी लहाने हिने करून उत्साहात या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# दिवाळी सजावट व कंदील बनविण्याचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण




**कर्जत : प्रतिनिधी**

माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान कर्जत आणि उषा कृष्णा फाउंडेशन नेरळ तसेच नारी सामाजिक संस्था दादर यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ येथील नेरळ विद्या मंदिर शाळेतील विद्यार्थ्यांना दिवाळी सजावट, कंदील तयार करणे आदींचे मोफत प्रशिक्षण दिले. त्यासाठी लागणारे साहित्य वाटप करण्यात आले.

नेरळ मधील नेरळ विद्या मंदीर शाळेत दिवाळीसाठी किंवा इतर कार्यक्रमात सजावट करण्यासाठी लागणारे कंदील, फुले ,लाईटिंग माळा डेकोरेशन, छोटे कंदील आदी प्लास्टिक विरोधी ईकोफ्रेंडली रंगीबेरंगी कागदापासून बनवायचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी सरपंच उषा पारधी यांच्या हस्ते प्रशिक्षण शिबिराचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठानच्या सचिव मनीषा सुर्वे, प्राचार्य प्रमोद विचवे, उपप्राचार्य कांतीराम भांडे, संजय शिंदे, प्रतिमा विशे, साधना बांगर, शितल म्हात्रे, शिल्पा लाड आदी उपस्थित होते.

याप्रसंगी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना पुण्याच्या ज्योती पाटील यांनी प्रशिक्षण दिले. या विद्यार्थ्यांनी आवडीने वस्तू बनवून आनंद घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याने कंदील बनवून आपल्या घरी नेले. यावेळी बोलताना मनीषा सुर्वे यांनी, 'विविध सणांना पर्यावरण पूरक वस्तू बनविण्याची आवश्यकता आहे. बाजारात जाऊन वस्तू विकत घेण्यापेक्षा आपण आपल्या हाताने वस्तू बनवतो. त्याचा वेगळा आनंद असतो.' असे स्पष्ट केले.

# भाजप रोहा तालुका सरचिटणीसपदी परेश चितळकर

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या तालुका सरचिटणीस पदावर परेश चितळकर यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली असून, पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही निवड महत्वाची ठरत आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, पक्षामध्ये आनंदाचे वातावरण आहे



चितळकर हे अत्यंत शिस्तबद्ध, अभ्यासू आणि कार्यक्षम कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. शासनाच्या योजना, GR, शासकीय कामकाज यावर सतत लक्ष ठेवणारे, वेळेचे व्यवस्थापन करणारे आणि संघटनात्मक बांधिलकी जपणारे कार्यकर्ते अशा स्वरूपात त्यांची ओळख आहे.

त्यांच्या या नियुक्तीमुळे पक्षाला एक नवा उमेद आणि संघटनात्मक दृष्टिकोन मिळेल, असा विश्वास कार्यकर्ते आणि नेतेमंडळींनी व्यक्त केला आहे.

भाजप कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी शुभेच्छा देताना म्हटलं:परेशसारखा संयमी, अभ्यासू आणि निष्ठावान कार्यकर्ता तालुका सरचिटणीसपदी विराजमान होतोय, याचा अभिमान वाटतो.

त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. असे म्हणत रोशन चाफेकर यांनी आपली भावना काव्यरूपात व्यक्त केली:

# कर्जत पोस्ट ऑफिसमध्ये होणार पैसे मोजण्याची मशीन उपलब्ध

**कर्जत :** कर्जत पोस्ट ऑफिसमध्ये नेहमीच ग्राहकांची गर्दी असते. यामध्ये विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त असते. पैसे भरण्यासाठी किंवा काढण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांना खूप ताटकळत रहावे लागते. हा वेळ वाचविण्यासाठी एका सामाजिक कार्यकर्त्याने पाठपुरावा केल्याने आता पैसे मोजण्याची मशीन उपलब्ध करण्यात येणार असल्याने ग्राहकांचा वेळ वाचणार आहे.

कर्जत पोस्ट ऑफिसमध्ये कॅशियरला पैसे मोजण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे ग्राहकांना तासन तास तेथे थांबावे लागते. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना त्रास होतो. ही बाब येथील एका सामाजिक कार्यकर्त्याच्या ही बाब लक्षात आली. त्याने वरिष्ठ पातळीवर पाठपुरवठा करून पैसे मोजण्याची मशीन उपलब्ध करावी, अशी मागणी केली. त्याच्या पाठपुराव्याला यश आले असून लवकरच कर्जत पोस्ट ऑफिसमध्ये पैसे मोजण्याची मशीन उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मुंबईतील पोस्टाचे अधिकारी सिमरन कौर यांनी लेखी कळविले आहे.

# चौक बाजारपेठेने घेतला मोकळा श्वास; सा. बां. विभागाने हटविली अतिक्रमणे

**चौक: प्रतिनिधी**




अनेक दिवस सार्वजनिक रस्त्यावरील आणि बाजुच्या गटारावरील बांधकामे आणि फेरीवाले यांचे अतिक्रमण हटविणार असे बोलले जायचे, मात्र कारवाई होत नव्हती, आज कारवाई झाल्याने चौक च्या बाजारपेठेणी मोकळा श्वास घेतला असे बोलले जात आहे.

ग्रामीण भागातील सर्वात मोठी आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या ग्रुप ग्राम पंचायत हद्दीतील चौक बाजार पेठ येथील अतिक्रमणे व बेकायदेशीर फेरीवाला यांना हटविण्याचे काम आज सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या या

मदतीने पूर्ण केले आहे.चौक बाजार पेठेतील रस्ता हा पूर्वीचा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार आहे, चौक बायपास होण्यापूर्वी याच बाजारपेठ मधून मुंबई पुणे व पुणे मुंबई हा प्रवास व्हायचा, कालांतराने चौक बायपास झाल्याने अतिक्रमणे वाढली, फेरीवाले वाढले,चौक हे विकसित शहर असून या परिसराचा झपाट्याने विकास होऊ लागला आहे.

चौक ही बाजारपेठ चाळीस पेक्षा जास्त गावांची आहे, त्यामुळे खरेदी विक्री जोरात असते. परिसराची व चौक येथील लोकसंख्या वाढत असल्याने बाजारपेठ मधील गर्दी वाढू लागली आहे, चौक बायपास रस्ता झाल्याने जुन्या रस्त्यावर अतिक्रमण वाढले, गटारावर अतिक्रमण बरोबर फेरीवाले बसू लागले, वाहन पार्किंग नसल्याने गाड्या रस्त्यावर उभ्या राहू लागल्या, बाईकस्वार यांची बेशिस्त वाढली, अधिकृत रिक्षा स्टँड नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याचीच झाली. या रस्त्याची डागडुजी आणि गटार योजना मंजूर झाली, परंतु स्थानिक अनास्था जास्त झाल्याने ही योजना रखडली, परंतु यातून सार्वजनिक बांधकाम विभागाने मार्ग काढत रस्ता पूर्ण केला.पण अतिक्रमण हटले नाही,

सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या नोटीसा व ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी दिलेल्या सूचना यामुळे दवंडी देऊन आज ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या कर्मचारी यांनी अतिक्रमणे काढली.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी,सरपंच, उप सरपंच व सर्व सदस्य, ग्राम पंचायत अधिकारी यांनी ही मोहीम यशस्वी केली.

# प्राथमिक शिक्षक सेवक पतपेढीच्या चेअरमनपदी राकेश मढवी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सेवकांची पतपेढी लिमिटेड माणगाव या पतसंस्थेच्या चेअरमनपदी सत्ताधारी पॅनलचे राकेश मंढवी यांची बिनविरोध निवड झाली तर व्हाईस चेअरमनपदी परेश अंधेरे यांनी बिनविरोध संधी मिळाली.

या पदांसाठी माणगाव येथे निवडणूक प्रक्रिया झाली. सत्ताधारी पॅनल मधील सर्व नऊच्या नऊ संचालकांनी या निवडीमध्ये सहभाग घेऊन ही निवड केली आहे. आता निवड झालेले चेअरमन परेश अंधेरे यांना यावर्षी रायगड जिल्हा परिषदेचा सन्मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार घोषित झाला आहे. त्यामुळे दोन्ही निवडीच्या बाबतीत दुग्धशर्करा योग जुळून आला आहे.

नवनिर्वाचीत चेअरमन आणि व्हाईस चेअरमन यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ संचालक रमेश उभारे, शिक्षक परिषदेचे तालुका अध्यक्ष गणेश निजामकर,माणगाव तालुका शिक्षण विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख संजय पालांडे, ज्येष्ठ संचालक तथा मार्गदर्शक संदीप शिंदे माणगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनंत थळकर, भाजप शहर अध्यक्ष राकेश जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या निवडीच्या वेळी अलिबाग शिक्षक पतपेढीचे ज्येष्ठ संचालक जितेंद्र बोडके, प्रकाश मानकर, सुजित भोजने, रोहिदास पवार निलेश उभारे, विकास महाडिक हे उपस्थित होते. पतसंस्थेच्या संचालिका ज्योती दांडेकर, स्मिता पाबरेकर संजय पाटोळे, संदीप साळवी, सचिन गंगावणे यांनी या निवडीमध्ये सहभाग घेतला.




**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

**Invitation for bids on E-Tendering basis**
Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Pen testing division and Pen circle office under Pen circle
Publication of NIT in News Paper and MSEDCL Web Site: 25.09.2025

| Sr. No. | Tender No. | Brifef Scope of work | Tender amount | Tender Fees | Tender Publish Date |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/PC/HR/T-03/2025-26 | Work of providing skilled / Unskilled outsourcing workers on contract basis at Pen testing division and Pen circle office under Pen circle. | 85.15 Lakh | 5000/- + 18% GST | Submission of bid 25.09.2025 to 09.10.2025 up to 23.55 Hrs online |

For details visit website http://etender.mahadiscom.in/eatApp

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**अग्निशमनविभाग दरपत्रके मागविण्यास सुचना**

पनवेल महानगरपालिका खालील कामासाठी इच्छुक संस्था यांचेकडून जाहिर माहोर बंद दरपत्रके मागवित आहेत. इच्छुकांनी परिपुर्ण भरलेली अंदाज दरपत्रके सीलबंद करुन दिनांक २५/०९/२०२५ रोजी पासुन दिनांक ०३/१०/२०२५ रोजी पर्यंत दु. ३.०० वाजेपर्यंत महापालिकेच्या अग्निशमन विभागात सादर करावीत. सदर तारखेनंतर प्राप्त झालेली कोणतीही दरपत्रक स्वीकारले जाणार नाही. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ०६/१०/२०२५ रोजी उप आयुक्त यांच्या दालनात दरपत्रक धारक अथवा त्यांचे समक्ष सायं. ०४.०० वा. उघडणेत येतील.

| अक्र. | साहित्याचेवर्णन/कामाचे नाव | नग | दर प्रती नग | एकुण दर जी.एस.टी सह |
|---|---|---|---|---|
| १ | MH ४६ BM १७५५ महिंद्रा ब्लाझो वॉटर ब्राऊझर वाहनाचे टायर खरेदी करणे. Tyre १४६/१४३ K | २ | | |
| | **एकूण** | | | |

**अटी व शर्ती :-**
१) दुकान नोंदणी प्रमाणपत्र व GST, पॅनकार्ड नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
२) सर्व नमूद जीएसटी / व्हॅट / वाहतूक खर्च यांसह नमूद असावेत.
३) सदरकामी वापरण्यात येणारे साहित्य चांगल्या प्रतीचे वापरले जावे अन्यथा साहित्य स्वीकारले जाणार नाही.
४) याकामी निव्वळ दरपत्रके मागणी करीत असल्याने याबाबत कोणत्याही अटी सदरचा विभाग बांधिल असणार नाही.

**सही-**
**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ४८०/४९३/२०२५**
**दिनांक :- २४/०९/२०२५**


# टेम्पो-कारच्या धडकेत चौघे जखमी

**खोपोली, खालापुर :** मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील माडप बोगद्या जवळ पुणे कडील बाजूस मारुती आर्टिका कार पुणे दिशेने जात असताना मागून येणारा टाटा टेम्पोने पुढे जाणाऱ्या आर्टिका कारला पहिल्या लेनवर धडक दिली. टेम्पोच्या मागून येणारा ट्रक कंटेनरने पुढे चालत असलेल्या टेम्पोला धडक दिली या अपघातामध्ये आर्टिका कार मधील ४ प्रवासी जखमी झाले. जखमींना एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे दाखल करण्यात आले.


**जाहिर नोटीस**

तुलसी हाईट्स को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी प्लॉट नंबर ८ सेक्टर १०ई, रोडपाली, कळंबोली, येथे पूर्ण बिल्डिंगचे पेटिंग चे काम देण्यात येत आहे. तरी कोणी इच्छुक वेंडर असतील त्यांनी खालील नंबर वर संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :- ९१ ९८२३९७०५८९**

**नमुना एन. डी.**
**(नियम ९२ (३) पहा)**
**परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46.BK5263 चे मालक विष्णू पदाजी पाटील यांचे तारीख १९/०५/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी, रेखा विष्णू पाटील, पत्ता : मु.पो. जासई ता. उरण,
जि. रायगड. ४१०२०६

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव : रेखा विष्णू पाटील**
**पत्ता : मु.पो. जासई, ता. पनवेल, जि. रायगड**

**गोकर्ण को- ऑप. हौ. सोसायटी (म.) पनवेल**
**पटेल पार्क बिं. नं ५, परदेशी आळी , पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

**जाहिर नोटीस**

प्रस्तावित सहकारी संस्था इमारत पूर्ण विकास योजनेअंतर्गत अनुभवी सक्षम व योग्य विकासकाकडून जुनी इमारत पाडून पनवेल महानगरपालिका नियमांच्या अधिन राहुन नवी इमारत बांधकासंबधीत निविदा मागविण्याबाबत
१) संस्थेचे नाव :- गोकर्ण को- ऑप. हौ. सोसायटी (म.) पनवेल
२) संस्थेचा पत्ता :- पटेलपार्क बिल्डींग नं.५ परदेशी आळी पनवेल , जि. रायगड
३) संस्था नोंदणी :- नोंदणी व आर.जी.डी/पी. डब्ल्यु.एल्./ एच.एस्.जी/(टिसी)१३४१/१९९७-९८ दि. २६/०३/१९९८
४) भूखंडाचे वर्णन :- एकूण क्षेत्रफळ ७४७.५० चौरस मिटर
५) अस्तीत्वात असलेली इमारतीतील सदनिका - २१
६) निविदा उपलब्धता :- सदर संस्थेच्या निविदा दिनांक ०३/१०/२०२५ ते ०९/१०/२०२५ चे दरम्यान संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते २.०० वरील नमूद केलेल्या पत्यावर मिळू शकते.
७) निविदा दाखल करण्याचे ठिकाण :- संस्था कार्यालयात
८) निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख ०५/१०/२०२५ ते १२/१०/२०२५ सोसायटी कार्यालयात सकाळी १०.०० ते ३.०० यावेळेत स्विकरण्यात येतील .
९) सहकारी संस्था यांचेकडे कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थेच्या इमारत पूर्नविकास समितीस आहे.

सही/- सेक्रेटरी/ खजिनदार | सही/- चेअरमन

**आकांक्षा को- ऑप. हौ. सोसायटी (म.) पनवेल**
**बिं. नं १, पटेल पार्क, परदेशी आळी , पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

**जाहिर नोटीस**

प्रस्तावित सहकारी संस्था इमारत पूर्ण विकास योजनेअंतर्गत अनुभवी सक्षम व योग्य विकासकाकडून जुनी इमारत पाडून पनवेल महानगरपालिका नियमांच्या अधिन राहुन नवी इमारत बांधकासंबधीत निविदा मागविण्याबाबत
१) संस्थेचे नाव :- आकांक्षा को- ऑप. हौ. सोसायटी (म.) पनवेल
२) संस्थेचा पत्ता :- पटेलपार्क बिल्डींग नं.१ परदेशी आळी पनवेल , जि. रायगड
३) संस्था नोंदणी :- नोंदणी व आर.जी.डी/पी. डब्ल्यु.एल्./ एच.एस्.जी/(टिसी)१३४४/१९९८ दि. २६/०५/१९९८
४) भूखंडाचे वर्णन :- एकूण क्षेत्रफळ ८८२.८५ चौरस मिटर
५) अस्तीत्वात असलेली इमारतीतील सदनिका - २१
६) निविदा उपलब्धता :- सदर संस्थेच्या निविदा दिनांक ०३/१०/२०२५ ते ०९/१०/२०२५ चे दरम्यान संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते २.०० वरील नमूद केलेल्या पत्यावर मिळू शकते.
७) निविदा दाखल करण्याचे ठिकाण :- संस्था कार्यालयात
८) निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख ०५/१०/२०२५ ते १२/१०/२०२५ सोसायटी कार्यालयात सकाळी १०.०० ते ३.०० यावेळेत स्विकरण्यात येतील .
९) सहकारी संस्था यांचेकडे कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थेच्या इमारत पूर्नविकास समितीस आहे.

सही/- सेक्रेटरी/ खजिनदार | सही/- चेअरमन

**श्रीपूजा को- ऑप. हौ. सोसायटी (म.) पनवेल**
**पटेल पार्क, बिं. नं २ व ३, परदेशी आळी , पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

**जाहिर नोटीस**

प्रस्तावित सहकारी संस्था इमारत पूर्ण विकास योजनेअंतर्गत अनुभवी सक्षम व योग्य विकासकाकडून जुनी इमारत पाडून पनवेल महानगरपालिका नियमांच्या अधिन राहुन नवी इमारत बांधकासंबधीत निविदा मागविण्याबाबत
१) संस्थेचे नाव :- श्रीपूजा को- ऑप. हौ. सोसायटी (म.) पनवेल
२) संस्थेचा पत्ता :- पटेलपार्क बिल्डींग नं.२ व ३ परदेशी आळी पनवेल , जि. रायगड
३) संस्था नोंदणी :- नोंदणी व आर.जी.डी/पी. डब्ल्यु.एल्./ एच.एस्.जी/(टिसी)११५५-९९/१३-५/१९९९
४) भूखंडाचे वर्णन :- एकूण क्षेत्रफळ ९९७.७५ चौरस मिटर
५) अस्तीत्वात असलेली इमारतीतील सदनिका - २९
६) निविदा उपलब्धता :- सदर संस्थेच्या निविदा दिनांक ०३/१०/२०२५ ते ०९/१०/२०२५ चे दरम्यान संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते २.०० वरील नमूद केलेल्या पत्यावर मिळू शकते.
७) निविदा दाखल करण्याचे ठिकाण :- संस्था कार्यालयात
८) निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख ०५/१०/२०२५ ते १२/१०/२०२५ सोसायटी कार्यालयात सकाळी १०.०० ते ३.०० यावेळेत स्विकरण्यात येतील .
९) सहकारी संस्था यांचेकडे कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थेच्या इमारत पूर्नविकास समितीस आहे.

सही/- सेक्रेटरी/ खजिनदार | सही/- चेअरमन

# भाजपतर्फे महिला रिक्षाचालकांचा सन्मान

## आरोग्य तपासणी शिबिरासह विविध उपक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष नवी मुंबईच्या वतीने बुधवारी (दि.२४) वाशीत महिला रिक्षा चालकांचा सत्कार, महिला आरोग्य तपासणी शिबीर आदी विविध उपक्रम राबविण्यात आले.

एकविरा रिक्षा चालक मालक संघटना, नवी मुंबईचे अध्यक्ष दशरथ भगत, कार्याध्यक्ष विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी रेल्वे स्थानक जवळ नवी मुंबईतील महिला रिक्षा चालक भगिनींचा सन्मान युवा नेते निशांत भगत यांच्या हस्ते करण्यात आला तर वाशीगाव येथील महिलासाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले होते.

नारी शक्ती अभियान अंतर्गत वाशीगाव येथील मनपा शाळेच्या सभागृहात वाशी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी मनेका पाटील





यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी वैद्यकीय उपचार सेवा देणाऱ्या महिला व पुरुष डॉक्टरांचा सन्मान माजी नगरसेविका फशीबाई भगत व संदीप भगत यांच्या हस्ते करण्यात आला.

सानपाडा सेक्टर १८ येथील कोस्टा ट्रेनिंग इन्स्टिटयूट एअर होस्टेज इन्स्टिटयूट मधील विद्यार्थिनींना दैनंदिनी डायडीचे वाटप करण्यात आले तर वाशीगाव येथील स्व. प्रेमनाथ पाटील चौकातील जेष्ठ निवारा शेड लोकार्पण करण्यात आले. उपक्रम माजी विरोधी पक्ष नेते दशरथ भगत यांच्या पुढाकारणे वनमत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात रिसर्च आविष्कार ओरिएंटेशनपर सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रिसर्च ॲडव्हायजरी व 'आविष्कार' समिती व विज्ञान संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२३) महाविद्यालयातील विज्ञान, संगणक व माहिती तंत्रज्ञान विभागातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च आविष्कार कन्वेंशनवर सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रामध्ये प्रा. डॉ. गुरमीत वधवा सहाय्यक प्राध्यापक रसायनशास्त्र विभाग, वीर वाजेकर महाविद्यालय उरण यांनी मार्गदर्शन केले. या शैक्षणिक उपक्रमामध्ये महाविद्यालयातील



विज्ञान, संगणक व माहिती तंत्रज्ञान विभागातील प्रथम वर्षाच्या एकूण १११ विद्यार्थीनी सत्राचा लाभ घेतला व प्रश्नोत्तर सत्रामध्ये आपले शंका दूर केल्या. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.

या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. डॉ. नीलम लोहकरे व प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले तसेच विज्ञान संघटना व रिसर्च डव्हायजरी समितीतील इतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढवण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असे आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले.



## दुर्गामाता दौड (माळ तिसरी)



**पनवेल :** श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान मार्फत पनवेलमध्ये तीन ठिकाणी श्री दुर्गामाता दौड काढण्यात आली. पहिली दौडीची सुरवात ही नवीन पनवेल सेक्टर-०७ इथून झाली. पुढे ही दौड सेक्टर ८,९,१० अशी मार्गक्रमण करीत सेक्टर ३ मधील मनसेने बसवलेल्या नवरात्र मधे पोहचली, तिथे देवीचे श्लोक घेण्यात आले व पुढे सेक्टर ४,५ मार्गक्रमण करून संतोष शेट्टी यांनी बसवलेल्या नवरात्र येथे येवून तिथे देवीची आरती घेण्यात आली व दौडीची सांगता करण्यात आली. दुसरी दाड ही करंजाडे गाव आणि सेक्टर भागात काढण्यात आली तसेच तिसरी दौड ही पनवेलमधील डेरवली या गावात काढण्यात आली. दरम्यान, या दौडमध्ये सहभागी होण्यासाठी शुभम साळुंखे (९७०२७०६२६२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सीकेटी विद्यालयात पालकांसाठी पुष्पगुच्छ स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या, नवीन पनवेल मधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागामध्ये संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.२३) शालेय स्तरावर पालकांसाठी पुष्पगुच्छ तयार करणे या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष श्री तुषार जाधव, संघाच्या सहसचिव स्नेहा जोशी तसेच सीकेटी ज्युनिअर कॉलेज प्राचार्य



प्रशांत मोरे, प्राथमिक विभाग मुख्याध्यापक सुभाष मानकर, पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यम मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, चांगू काना ठाकूर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री कैलास सत्रे, पर्यवेक्षक श्री कैलास म्हात्रे उपस्थित होते .

या स्पर्धेमुळे पालकांना आपली कलात्मकता, सर्जनशीलता व हतोटी सादर करण्याची संधी मिळाली. पालकांनी रंगीबेरंगी फुलांचा सुंदर वापर करून आकर्षक पुष्पगुच्छ साकारले. अनेकांनी नैसर्गिक फुलांना अभिनव कला कुसरीतून साज चढवून एकापेक्षा एक सरस रचना साकारल्या.


पुष्पगुच्छ स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सदस्य राहुल घरत तसेच प्रतीक ठाकूर व नगरसेविका सौ वृषाली वाघमारे उपस्थित होत्या. स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्रीमती दिपाली किशोर बुकम (८वी ब), द्वितीय क्रमांक सौ उज्वला सचिन भिसे (७वी अ) तृतीय क्रमांक सौ सोनाली वासुदेव पालवे (८वी अ) यांनी प्राप्त केला. या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेमध्ये पालकांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतल्याने शाळेच्या प्रांगणात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमातून शाळा, विद्यार्थी व पालक यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त करून या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले.संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख, सचिव एस. टी. गडदे यांनी पालकांना पुष्पगुच्छ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# काळसेकर टेक्निकल कॅम्पसतर्फे आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-इ-इस्लाम्स काळसेकर टेक्निकल कॅम्पस (AIKTC), न्यू पनवेल येथे १८ ते २० सप्टेंबर २०२५ दरम्यान दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद इनोव्हेटिव्ह टीचिंग अँड एक्झ्युबेरंट लर्निंग (iCiTeL-2.0) यशस्वीरीत्या आयोजित झाली. या परिषदेत देश-विदेशातील प्राध्यापक, संशोधक आणि शिक्षक एकत्र येऊन नवीन अध्यापन पद्धती व शिक्षणातील नवनवीन कल्पना यावर चर्चा झाली.

परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमाला मुख्य पाहुण्या म्हणून डॉ. लुईस पेम्बर्टन, उप अधिष्ठाता, शिक्षण व अध्यापन, चार्ल्स स्टर्ट युनिव्हर्सिटी, ऑस्ट्रेलिया उपस्थित होत्या. तसेच अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष डॉ. जाहिर आय. काझी



(पद्मश्री २०२४) यांनी अध्यक्षीय भाषण दिले.

तीन दिवस चाललेल्या या परिषदेतील सहभाग लक्षणीय ठरला. एकूण १६३ जणांची नोंदणी झाली होती, ६ देश व ३५ संस्था येथे सहभागी झाल्या आणि आलेल्या १०१ संशोधन प्रबंधांपैकी ५३ निवडून सादर करण्यात आले. २० सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या समारोप व सर्वोत्कृष्ट प्रबंध पुरस्कार सोहळ्यास डॉ. के. के. सँगले, डीन, VJTI मुंबई हे मुख्य पाहुणे होते तर डॉ. सिती मस्लियाना सिरेगर, डीन, फॅकल्टी ऑफ मेडिसिन, UMSU, इंडोनेशिया या विशेष पाहुण्या होत्या. समारोपात बुरहान हॅरिस, कार्यकारी अध्यक्ष, BINM, मुंबई यांनी मार्गदर्शन केले. या परिषदेचे संयोजन डॉ. अबुसुफयान शेख आणि डॉ. रोहन दासगुप्ता यांनी केले. डॉ. रमजान खाटीक हे परिषदेचे अध्यक्ष होते. डॉ. राजेंद्र मगर, डॉ. शारिक सय्यद व प्रा. राज म्हात्रे यांनी सह-अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली.



**पनवेल : भाजप विचुंबे पंचायत समितीचे अध्यक्ष व वांगणीतर्फे वाजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सतीश मालुसरे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.**



**उरण : येथील सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाची विराजमान देवी.**

# कामोठ्यात नॅपकिन बुके हाऊसतर्फे मुख्याध्यापिकांना नवदुर्गा पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरातील १४ शाळांच्या मुख्याध्यापिकांना नवरात्री उत्सवादरम्यान नवदुर्गा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. एस नॅपकिन बुके हाऊस पुरस्कृत मानसी सामाजिक संस्थेच्या सौजन्याने हा कार्यक्रम करण्यात आला.

नवदुर्गा पुरस्कार ही केवळ एक आनंदवार्ता नसून आमच्या हृदयाला उर्जा देणारी, अभिमानाची आणि प्रेरणेची घटना आहे, असे पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापकांनी उद्गार काढले.

मुख्याध्यापिका म्हणजे स्वप्नांना पंख देणारी आणि संघर्षाला प्रेरणा देणारी आईसमान व्यक्तीरेखा आहेत, असे गौरवोद्गार सविता गोरखनाथ यांनी काढले. 'मी स्वतः एक विद्यार्थिनी असून तसा अनुभव घेते', असे एस नॅपकिन बुकेच्या संचालिका मानसिक पोळ म्हणाल्या. ज्ञानाच्या वाटेवर चालत राहा, यश तुमच्या पावलांखाली नतमस्तक होईल, असे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मंदार पनवेलकर यांनी काढले.

डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या हस्ते महाराष्ट्र भूषण उत्कृष्ट निवेदक कविता डॉट कॉम सदस्य




नारायण लांडगे पाटील यांना सन्मानित करण्यात आले. एस नॅपकिन बुकेच्या जडणघडणीमध्ये काम करणाऱ्या महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

अश्विनी देशमुख, सुनीता कदम, मनीषा जाधव, स्नेहल पाटील, निकिता पाटील, संध्या मोरे, कविता लक्ष्मी, कल्पना जिरे, मोहिनी वाघ, स्मिता पनवेलकर, दिपाली संकपाळ, स्वप्नाली म्हात्रे, सुजाता संदीप पाटील, दक्षता म्हात्रे या पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापिकांचा गौरव झाला.

## नवरंग | रंग निळा



श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, गव्हाण-कोपर



रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर





अभुदय को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, खांदा कॉलनी



कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालय, कर्जत प्राध्यापिका



सीकेटी विद्यालय, नवीन पनवेल
(पुर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यम)

# जिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामातील सीआरझेडचा अडथळा दूर

## दोन दिवसांत बांधकामाला होणार सुरूवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील शासकीय जिल्हा रूग्णालयाच्या नवीन इमारतीला पर्यावरण समितीची परवानगी मिळाल्यामुळे या नवीन इमारतीच्या बांधमातील अडथळा आता दूर झाला आहे. लवकरच सात मजली इमारतीच्या कामला सुरूवात हाणार आहे.



अलिबाग येथील जिल्हा शासकीय रूग्णालयाची इमारत ४० वर्षे जुनी आहे. ही इमारत जूनी असल्यामुळे धोकादयक बनली आहे. ती पाडून जिल्हा शासकीय रूग्णालयाची नवीन इमारत बांधण्यात यावी अशी मागणी केली जात होती. ५ मार्च २०२५ मध्ये या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भुमीपूजन करण्यात आले होते.

परंतु ही इमारत समुद्रकिनार्यापासून ५०० मीटरच्या आत असल्यामुळे इमारत बांधण्यसाठी पर्यावरण समितीची परवानगी मिळने आवश्यक होते. ही परवानगी न मिळाल्यामुळे प्रत्यक्ष बांधकामाला सूरूवात होऊशकली नाही. पर्यावरण समितीची मुदत संपल्यामुळे ही समिती बरखास्त करण्यात आली होती.

नवी समितीने रायगड जिल्हा शासकीय रूग्णालयाच्या नवीन सात मजली इमारत बांधण्यास आवश्यक असलेली परवानगी दिली आहे. त्यामुळे आता दोन दिवसांमध्ये रूग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाला लवकरच सुरूवात होईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागातून देण्यात आली.

जिल्हा रुग्णालय परिसरात २ लाख चौरस फूट बांधकाम करून ३०० बेडचे अद्यावत रुग्णालय उभारले जाणार आहे. नवीन इमारतीत सात माजली असेल. ३०० बेडसह २० बेडचे वेगळे आयसीयू कक्ष असणार आहे. १६ बेडचे नवजात बालकक्ष, २० बेडचे डायलिसिस सेंटर, रुग्ण थांबा कक्ष, अपघात विभाग तसेच अपघात विभागात वेगळे शस्त्रक्रिया कक्षही उभारले जाणार आहे.

इमारतीत पाच मोड्युलर अद्यावत असे यंत्र सामुग्रीसह शस्त्रक्रिया कक्ष ही बांधले जाणार आहेत. यामध्ये अथम, अर्थो, जनरल, स्त्री रोग शस्त्रक्रिया कक्ष असणार असून एचआयव्हि, एचएसबी बधितासाठीही वेगळे शस्त्रक्रिया कक्ष असणार आहे.

याशिवाय लॉड्री, पाककक्ष, क्षकिरण कक्ष, चार लिफ्ट, दोन जिने एक रॅम्प अशी सुविधा इमारतीमध्ये असणार आहे.

### पतीचे गुपित सांगण्याच्या बहाण्याने महिलेचा विनयभंग

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील उक्रुळ पो, चिंचवली परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीने महिला फिर्यादी यांचा मोबाईल क्रमांक मिळवून तुझ्या नवऱ्याबाबत मला काही माहिती आहे असे बहाणे सांगून त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत विनयभंग केल्याचा प्रकार घडला.

नेरळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपीताने फिर्यादी महिलेचा मोबाईल नंबर मिळवून तिला संपर्क साधला होता,यावेळी तुझ्या पती विरोधात काही खाजगी माहिती द्यायची सांगून पीडित महिलेचा मोटरसायकलवरुन पाठलाग, फोन कॉल्स करून आणि एकांतामध्ये भेटण्यास भाग पाडून, महिला फिर्यादी यांचा विनयभंग केला. या प्रकारामुळे महिला गंभीर मानसिक त्रासाच्या अधीन झाल्या आहेत.

याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला पुढील तपास नेरळ पोलीस ठाण्याचे हवालदार सुरेश मोरे करत आहेत.

## महावितरणच्या वीज देयक वितरण व्यवस्थेचा बोजवारा

**अलिबाग : प्रतिनिध**

वीज देयके वितरण करणाऱ्या ठेकेदाराने काम बंद केल्याने अलिबाग विभागातील महावितरणच्या ग्राहकांना गेल्या चार महिन्यापासून वीज देयकांचे वितरण झालेले नाही. महावितरणच्या वीज देयके वितरण व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे.

> **वीज देयके वाटप करणाऱ्या एजन्सीकडून वीज वितरणाचे काम थांबवण्यात आले आहे. त्यामुळे सध्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने वीज देयकांचे वितरण आम्ही सुरू केले आहे. नवीन एजन्सी नेमण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.**
> **–शैलेश कुमार, कार्यकारी अभियंता महावितरण, रायगड**

वीज ग्राहकांना दर महिन्याला साधारणपणे दरमहिन्याच्या १५ तारखेला वीज देयके प्राप्त होत होती. ज्या वीज देयकांचा भरणा साधारणपणे दरमहिन्याच्या ३० तारखेपर्यंत करणे अपेक्षित होते. मात्र मे महिन्यापासून अलिबाग विभागातील ग्राहकांना वीज देयके मिळत नाहीत.

वीज देयकांचे वितरण होत नाहीत तर दुसरीकडे मीटर रिडींग नघेता सरासरी वीज देयकांची आकारणी केली जात आहे. सरासरी वीज देयकांच्या आकारणीमुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत. महावितरण कार्यालयातील ग्राहक सेवा केंद्रात येऊन वीज देयकांची प्रत करून घ्या, मोबाईलवर येणाऱ्या संदेशाव्दारे वीज देयके भरा, अथवा वीज देयके ऑनलाईन मिळण्यासाठी ई मेल रजिस्टर करा असे महावितरण कार्यालयाकडून ग्राहकांना सांगितले जात आहे.

नियमित वीज देयके मिळाली तर वीज देयकांचा भरणाही नियमित होईल त्यामुळे महावितरणने तातडीने वीज देयकांचे वितरण सुरू करावे अशी मागणी ग्राहकांनी केली आहे. सोलार रुफ टॉप योजनेचे ग्राहकांना ऑनलाईन पध्दतीने वीज बीले दिली जातात. ही देयके ही नियमित मिळत नाहीत

## निजामपूर बाजारपेठेत होंडाई कारने घेतला पेट

**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुक्यातील निजामपूर बाजारपेठेत हुंडाई कारने रात्री दोन वाजल्याच्या सुमारास अचानक पेट घेतला चालकाच्या प्रसंग अवधाने जीवितहानी टाळली, कार क्रमांक एम एच ३२ वाय ०८७१ ही चालक रविचंद्रन प्रसाद राहणार पुणे हे त्यांचे ताब्यातील वर नमूद गाडी गोवा येथून पुणे येथे चालवीत घेऊन जात असताना निजामपूर येथे थांबले असता त्यांचे गाडीने अचानक पेट घेतला.




गाडीला लागलेली आग अग्निशामन दल माणगाव यांचे मदतीने विजवण्यात आली आहे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

माणगांव तालुक्यात बर्निंग कार या घटना सतत घडत असून वाहन चालकांनी सुद्धा असे प्रकार घडू नये याबाबत तत्पर राहणे हे अत्यंत गरजेचे आहे.

रात्रीच्या वेळेस बाजारपेठ बंद असल्यामुळे जीवितहानी होऊ शकली नाही. तसेच असे प्रकार वारंवार होत असल्यामुळे वाहन चालकांनी दक्षता घेणे अत्यंत गरजेच आहे असे नागरिकांन मधून बोलले जात आहे.

## आई कनकाई सामाजिक संस्थेने घडवले देवदर्शन

**माणगाव : बातमीदार**

आई कनकाई सामाजिक संस्था होडगावचे संस्थापक अध्यक्ष सुशील कदम यांनी होडगाव – पळसगाव ग्रुप मधील सुतार समाज बांधवांना विश्वकर्मा प्रकट दिन या कार्यक्रमासाठी वेरूळ येथे उपस्थित राहण्यासाठी संस्थेमार्फत बसची मोफत व्यवस्था करून देवदर्शन घडवले.



दरवर्षी विश्वकर्मा वंशज १७ सप्टेंबर रोजी विश्वकर्मा प्रकट दिन छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ येथे मोठ्या प्रमाणात साजरा करतात. या कार्यक्रमासाठी राज्यभरातून लाखो समाज बांधव उपस्थित असतात. यावर्षी रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात समाज बांधव यांची वेरूळ येथे जाण्यासाठी संख्या वाढली. मंत्री भरतशेठ गोगावले यांनी या कार्यक्रमाला जाण्यासाठी २ बसेसची मोफत व्यवस्था केली. परंतु महाड, पोलादपूर आणि गोरेगाव येथून मोठ्या प्रमाणात समाज बांधव कार्यक्रमासाठी निघाले. दोन बस हाउसफुल झाल्यामुळे या ४४ जणांना वेरूळ येथे नेण्यासाठी अडचण निर्माण झाली.

याबाबत सुशील कदम यांना माणगाव तालुका सुतार समाज संघटनेचे सचिव संतोष सुतार यांनी अडचण सांगितली

सुशील कदम यांनी क्षणाचाही विलंब न लावता ट्रॅव्हल्स मालकाशी बोलून ताबडतोब येणारा खर्च ट्रॅव्हल्स मालकाला सुपूर्द केला. सुशील कदम यांच्यामुळेच होडगाव – पळसगाव ग्रुपमधील या गावांमधील समाज बांधव वेरूळला जाऊ शकले.

## जीएसटीसंदर्भात खासदार सुनील तटकरेंचा रोहा बाजारपेठेत व्यापाऱ्यांशी संवाद

**रोहे: प्रतिनिधी**

केंद्र सरकारने जीएसटी मध्ये बदल केल्यानंतर देशभरात जीएसटी बचत उत्सव साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने रायगड लोकसभा मतदारसंघातील खा.सुनील तटकरे यांनी जीएसटी बचत उत्सव स्वदेशी अभियान' अंतर्गत रोहा शहरातील बाजारपेठेत व्यापाराची संवाद साधला आहे.



यावेळी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगराध्यक्ष समिर शेडगे, मोतीशेठ जैन, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, मयुर दिवेकर, राकेश जैन, कैलाश जैन, दिलीप सोलंकी, वसंत कोठारी, विलास गुजर, माज सवाल, स्वप्नील धनावडे, संतोष कडव, भावेश दामाणी आदी होते खा.सुनील तटकरे यांनी व्यापाऱ्यांची त्यांच्या दुकानात जाऊन भेट घेतली.खा.सुनील तटकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रांतिकारक निर्णय घेतला असून याचा फायदा व्यापाऱ्यांच्या माध्यमातून ग्राहकांना, मध्यमवर्गीय व सर्वसामान्यांना होणार आहे. व्यापारी मित्रांनी हे ग्राहकांपर्यंत पोहोचवावे असे सांगितले. निश्चीत जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, छोटे व्यावसायिक मोदी साहेबांनी जाहीर केलेली सवलत ग्राहकांपर्यंत पोहचवतील.. व्यापाराची संवाद साधताना खा.सुनील तटकरे यांनी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींनी जाहीर केलेली जीएसटी दरकपात ही 'स्वयंभू भारत' घडविण्यासाठीचे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही दरकपात केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर राष्ट्रीय विकासाच्या दिशेनेही एक ठोस वाटचाल ठरणार आहे.

## नवरात्रोत्सवात पावसाची होतेय तरूणाईला अडचण

**तळा : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सव सुरू झाल्यापासून पावसाचीही सुरूवात चांगलीच झाल्याने तरूणाईला आपले गरबा,दांडीयातील नृत्य सादर करण्यात येत आहेत अडचणी.

गणेशोत्सव झाल्यानंतर सारी मंडळी नवरात्रोत्सवाच्या तयारीला लागत असतात नवरात्रोत्सवाच्या काही दिवस आधीपासून तरूणांनी मोठ्या हौसेने नवनवीन ड्रेस, आकर्षक दांड्या खरेदी करून घेतल्या आहेत.तसेच काही दिवस सरावही करत असतात व आपल्या गरबा नृत्याचे सादरीकरण करण्यासाठी प्रोत्साहित असतात.मात्र नवरात्रोत्सवात पावसाने हजेरी लावल्याने गरबा करण्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत.

मोठ्या उत्साहात नवरात्रोत्सवाची सारी मंडळी वाट पाहत असते मात्र असा पाऊस पडत असल्याने तरूणाहीची हिरमोड झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.अनेक ठिकाणी प्लास्टिककापडाचा वापर करून मंडप बांधले




गेले आहेत त्यामुळे काही प्रमाणात ही अडचण होईल असे वाटते.तसेच या उत्सवात विविध स्पर्धा घेण्यात येतात या स्पर्धा घेण्यास आता पावसामुळे जागा कमी पडत आहे.

## अकिल मुलाणी जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील माधवबाग हॉस्पीटल यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अकिलअहमद मुलाणी यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले आहे.



खोपोली येथे माधवबाग हॉस्पीटल यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते व माधवबाग हॉस्पीटलचे प्रशासक डॉ. राहूल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली अकिलअहमद मुलाणी यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी सोमय्या विद्यापीठाचे कुलसचिव ज्ञानेश्वर मगर, मुख्याध्यापक अरूण खुळपे आदी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील अशोक ल लोखंडे विद्यामंदिर, पिटसई येथे सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे संस्थेचे अध्यक्ष खेळु वाजे, सेक्रेटरी संजय रेडीज, आदिनी अभिनंदन केले

## सर्वपितरीच्या निमित्ताने मअंनिसतर्फे खाऊवाटप

**पेण : प्रतिनिधी**

सर्वपितरी अमावस्येच्या निमित्ताने रविवार २१ सप्टेंबर रोजी पेण येथील अहिल्या महिला मंडळात शिकणाऱ्या आनंदी वसतिगृहात दरवर्षी प्रमाणे मअंनिसच्या वतीने उपक्रम घेण्यात आला. पाणीपुरी, भेळ असे चाट पदार्थ आणि खजूर बदाम असा पौष्टिक खाऊ अंनिस (शाखा पेण)च्या वतीने मुलींना देण्यात आला.

संत तुकाराम महाराजांच्या विचाराने प्रेरित होऊन आजचा उपक्रम आयोजित केला होता. स्वर्गस्थ पितरांचे ऋण व्यक्त करण्यासाठी अनेक जण कावळ्याला अन्न खाऊ घालतात. त्या ऐवजी आपल्या समोर असलेल्या पुढच्या पिढीला त्यांच्या आवडीचे खाद्य पदार्थ द्यावेत आणि पितरांचे ऋण फेडताना मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवावे, असा संदेश अंनिस (शाखा पेण) यांनी ह्यानिमित्ताने दिला. चमत्कार संशोधन दिनाबद्दल माहिती दिली आणि वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय त्याबद्दल सांगितले. कार्यक्रमाला महाराष्ट्र अंनिस शाखा पेण तर्फे जगदीश व योगिता डंगर, एन जे पाटील सर, श्रीमती स्मिता पाटील आदी हजर होते.




## अपघात प्रवणक्षेत्र जागी संरक्षक कठडा लवकरच बांधावा; स्थानिकांची मागणी

**माथेरान : बातमीदार**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांची बाराही महिने मोठी रेलचेल असते. विशेषतः वर्षा ऋतूमध्ये येथील नयनरम्य देखावे न्याहाळण्यासाठी आणि येथील निसर्गाच्या सानिध्यात काही क्षण निवांत घालविण्यासाठी जुन्या पर्यटकांसह नवखे पर्यटक देखील आवर्जून हजेरी लावत असतात.



अनेकदा काही पर्यटक स्वतःच्या वाहनाने येथील नागमोडी घाटरस्त्याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करत असतात परंतु काहीवेळा अवघड आणि अरूंद घाट रस्त्यावरून वाहन अतितीव्र चढावावर चालवताना त्यांची दमछाक होताना दिसून येते. काही ठिकाणी तर या रस्त्यांची अक्षरशः दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे आपल्या लेनने वाहन चालवीत असताना पुढील अवघड वळणाचा त्यांना अंदाज येत नाही. त्यामुळेच सुरक्षित कठड्याला धडक बसून किरकोळ अपघात होत असतात.

अशाच एका वॉटर पाईप रेल्वे स्टेशन खालील पिटकर पॉईंट या अवघड वळणावर अनेकदा अपघात घडले आहेत. अगदी अरुंद वळण असल्याने नवख्या वाहन चालकांना ताबडतोब स्टेरिंग सरळ करणे अथवा वाहन बाजूला घेणे जमत नाही. वाहन चालक गोंधळून गेल्याने पिटकर पॉईंट येथून काही फुटांवर वाहने पडून अपघात घडत आहेत. सुदैवाने अद्यापही याठिकाणी जरी जीवितहानी झालेली नसली तरी सुद्धा वाहनांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेली अनेक उदाहरणे आहेत..

माथेरान नेरळ घाटातील वॉटर पाईपच्या खालच्या वळणावर यावर्षात सर्वाधिक अपघात झालेले आहेत. धोकादायक वळण असल्याने नवख्या वाहन चालकाला या वळणाचा अंदाज नसतो.त्यामुळे मजबूत संरक्षक भिंत किंवा रेलिंग केल्यास दुचाकी व चारचाकी वाहन चालकांकडून होणारे अपघात थांबविता येतील. असे भाजपा शहर अध्यक्ष प्रविण सकपाळ यांनी सांगितले

## एआयविषयी नेने महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब नेने महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागाकडून बुधवार (दि.२४) रोजी आर्टिफिशियल इंटेलिजन्स एआय : आव्हाने आणि संधी ' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. ओमकार दाभाडकर ( संस्थापक, सीईओ, बूम१, मुंबई), श्री. तुषार कुटे (ज्येष्ठ डाटा शास्त्रज्ञ, मुंबई) आणि श्री. चेतन टाकसाळे (संचालक, सॉफ्टेक सोल्युशन्स, पुणे) लाभले आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अँड. मंगेश नेने भूषविणार आहेत. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप उपस्थित राहणार आहेत.

सदर चर्चासत्र हे सर्वांसाठी खुले आहे. सदर चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात येणार असून, संशोधक, विद्यार्थी, प्राध्यापक या सर्वांनी चर्चासत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक प्रा. सौ. पल्लवी आनंद चाटुफळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख यांच्यावतीने करण्यात आले आहे.

त्यासाठी https://forms.gle/oon2yv6ehb4jtu8 या लिंकवरजास्तीत जास्त जणांनी नावनोंदणी करावी असे आवाहन संस्थे तर्फे करण्यात आले आहे

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची विभागीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी ज्युनिअर कॉलेजचा बॅडमिंटन संघ प्रथम क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महापालिका आयोजित मंगळवारी (दि.२३) कर्नाळा स्पोर्टस अकॅडमी येथे झालेल्या बॅडमिंटन सिंगल व डबल या दोन्ही प्रकारामध्ये नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विघ्नेश दत्तात्रय चव्हाण, शिवाजी हरजी पटेल, प्रथमेश आनंद बडे (बारावी सायन्स), हर्ष विजय कदम (अकरावी सायन्स) तर मुकेश मणिवांना यादवर (बारावी कॉमर्स) हा बॅडमिंटनचा संघ प्रथम क्रमांकाने विजयी झाला.

या संघाची विभागीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. बॅडमिंटन संघाने प्रथम क्रमांक मिळविलेल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उद्यापासून राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अधिपत्याखाली क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्ह्यास बॉक्सिग, खो-खो, हॅण्डबॉल, टेबल टेनिस, कबड्डी आणि कुस्ती या खेळांचे विविध वयोगटात्त राज्यस्तर स्पर्धा यजमानपद देण्यात आले आहे. या ६ खेळापैकी बॉक्सिग खेळाचे १७ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या स्पर्धाचे आयोजन २५ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकूल नेहूली-संगम अलिबाग येथे होणार आहे.

या राज्य स्पर्धेत राज्यातील आठ महसूल व एक राज्य क्रीडा प्रबोधिनीचा संघ असे विभागातील जवळपास ३०० खेळाडू, संघव्यवस्थापक व मार्गदर्शक सहभागी होणार आहेत. या स्पर्धांमधून विजयी स्पर्धक हा राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे. बॉक्सिंग स्पर्धेचा प्रचार प्रसार व्हावा तसेच जिल्ह्यात सर्वदुर या खेळाची वातावरण निर्मिती व्हावी या उद्देशाने तालुका संकूल समितीच्या माध्यमातून नेहूली येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या प्रशस्त बंदिस्त हॉलमध्ये नव्या कोऱ्या बॉक्सिंग रिंगची स्थापना करण्यात आली असून राज्यातून येणाऱ्या बॉक्सर्सना आपला खेळाचा दर्जा सिध्द करण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे.

या राज्यस्तर शालेय बॉक्सिंग स्पर्धेचा उद्घाटन सोहळा २६ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, अलिबाग नेहुली-संगम येथील भव्य पटांगणात संपन्न होणार आहे.

# एमएनएम विद्यालयाची कराटे स्पर्धेमध्ये दमदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अंतर्गत तालुकास्तरीय कराटे स्पर्धेमध्ये १७ व १९ वर्षाखालील



(मुली) वयोगटांमध्ये जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालयाने दमदार कामगिरी केली आहे.

एमएनएम विद्यालयातील जीविका पाटील (५८ किलो वजनी गटात),१७ या वर्ष वयोगटात सुवर्णपदक मिळविले. तसेच कुमारी सर्वस्वी हरीश गुंडारकर हिने (६२ किलो वजनी गटात). १९ वर्ष वयोगटात सुवर्णपदक अर्जित केले. तसेच ईश्वरी राजेंद्र महाडिक हिने रजत पदक, तसेच सांज प्रवीण नाईक हिने रजत पदक मिळविले, दीक्षांत शरद उबाळे, तसेच शरण्या हरीश गुंडारकर हिने कांस्यपदक पटकाविले.

तालुकास्तरीय स्पर्धेचे नेटके आयोजन आणि नियोजन सेंट अँड्र्यूज स्कूल वाकडी पनवेल यांनी केले. तालुकास्तरीय स्पर्धेमधील कामगिरीबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत प्रोत्साहित केले. शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, तसेच पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कराटे स्पर्धेसाठी परेश पावस्कर, वामन कुऱ्हाडे, वर्षा नलावडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रायगडच्या अकॅडमीने सवात चॅम्पियनशिप जिंकली



**मोहोपाडा** : सातवी महाराष्ट्र राज्य सवात चॅम्पियनशिप २०२५ ही देवगिरी लॉन्स व हॉल वाई येथे झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अॅण्ड फिटनेस अकॅडमीच्या खेळाडूंनी पदके जिंकत चमकदार कामगिरी केली.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून तब्बल २००हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. प्रमुख पाहुणे म्हणून सुहास धाईंजे (अध्यक्ष, ऍमेच्युअर सवात असोसिएशन ऑफ महाराष्ट्र) होते.

स्पर्धेत मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अॅण्ड फिटनेस अकॅडमीचे संस्थापक भूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली खांदा कॉलनी, सीकेटी महाविद्यालय, बालग्राम कळंबोली, एसएमडीएल महाविद्यालय, विचुंबे न्यू पनवेल व स्मॉल वंडर स्कूल शाखेतील निवडक २४ खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ सादर करत तब्बल सहा सुवर्णपदक, ११ रौप्यपदक व सात कांस्यपदक मिळवून पहिल्या क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावली.



















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com